

# शिरडी वृत्त

## बाबांच्या काळात घेऊन जाणारा

# 'चावडी'चा जिर्णोद्धार

**शिरडी :** एरवी सर्वसामान्य इतर वास्तुंप्रमाणे दिसणाऱ्या एखाद्या वास्तुनेआपले सध्याचे रूप बदलुन थेट भुतकाळातील स्मृती जिवंत कराव्यात, या वास्तुत प्रवेश केला की आपणही त्या काळात तर वावरत नाही ना असा आभास निर्माण व्हावा.

ही कल्पान मूर्त स्वरूपात साकार करण्याची किमया आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून शिरडीत साकार करण्यात आली आहे. साईबाबांच्या चावडीने आपले मूळ रूप पुन्हा धारण केले आहे. सुमारे ५९ वर्षांपुर्वी या इमारतीचा जीर्णोद्धार चिंचोलीकर नावाच्या गृहस्थांनी केला. साईबाबा येथे बसत असत म्हणून **'बाबांची चावडी'** या नावाने ही चावडी ओळखली जाते. काळानुसार या चावडीचे रूपही बदलले. मूळच्या भिंतीवर सिमेंटचे प्लास्टर आले, त्यापाठोपाठ रंगाचे लेप बसले. पुढच्या बाजूला साईबाबांची प्रतिमा स्थानापन्न झाली तर मागच्या दोन खोल्या अडगळीच्या म्हणून वापरात आल्या. ऊन, वारा, पाऊस सोसत वर्षानुवर्षे उभी असलेली ही इमारत मातीत बांधलेली असल्यामुळे अशक्त झाली, प्लास्टर उडाले, छत गळू लागले, भिंतीतील विटा-दगड निखळू लागले.

देश विदेशातील हजारो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या साईबाबांची ही चावडीदेखील साई-भक्तांच्या श्रद्धेची वास्तू म्हणून ओळखली जाते.


सुमारे ५९ वर्षांनंतर या चोवडीचा जीर्णोद्धार करण्याचा निर्णय साई-संस्थानच्या विश्वस्त मंडळाने घेतला. संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर हे ''मुंबई हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटी'चेही अध्यक्ष आहेत. ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याची त्यांना जाण आहे. या हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटीत काम करताना वास्तुसंवर्धनशास्त्रातील तज्ज्ञांसोबत काम करण्याची संधी मिळाली त्यामुळे आपणाला ही दृष्टी मिळाली हे श्री. सुकथनकर यांनी सांगितले.

मूळ वास्तूचा एक दगड अथवा वीट न बदलता आहे ती स्थिती कायम ठेवून चावडी

---

**श्री साईबाबांच्या वास्तव्याने - स्पर्शाने पावन झालेल्या शिरडीतील वास्तू या साईभक्तांच्या श्रद्धेची निधाने आहेत. ऊन, वारा, पाऊस आणि काळ यामुळे या वास्तू जीर्ण होणे ही नैसर्गिक गोष्ट असल्याने या वास्तूंचा आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे जीर्णोद्धार करून त्यांचे श्री साईबाबांच्या काळात होते तसे रूप कायम ठेवून सुदृढीकरण करण्याचे कार्य विद्यमान विश्वस्त मंडळाने हाती घेतले असून 'चावडी'चे जीर्णोद्धाराचे कार्य नुकतेच पूर्ण झालेले आहे. 'चावडी'चे हे जीर्णोद्धाराचे काम पाहून लोकसत्ताचे वार्ताहर श्री. वैजापूरकर यांनी वृत्तपत्रात लिहिलेला वृत्तांत आम्ही येथे जशाच्या तसा प्रसिद्ध करीत आहोत. त्यावरून जीर्णोद्धार कार्याचा नेमका दृष्टिकोन व नेमके स्वरूप भक्तांना चटकन कळून येईल असे वाटते.**

---



चावडीचे जीर्णोद्धारापूर्वीचे दृष्य व जीर्णोद्धारानंतरचा कायापालट.

मजबूत करण्याचे काम हाती घेण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सुमारे दोन महिन्यांच्या कालावधीनंतर बाबांच्या चावडीच्या मागील दोन खोल्या थेट भूतकाळाच्या साक्षीदार झाल्या आहेत. एकेकाळी सिमेंटच्या प्लास्टरमध्ये हरवून गेलेले नक्षीदार कोनाडे, भिंतीचे दगड, अर्धवर्तुळाकार देवळ्या आपल्या मूळ स्वरूपात पुन्हा प्रकट झाल्या आहेत. लाकडी छत चकाकू लागले आहे. दर्शनी भिंती पाहून ही इमारत जुनी की नवी असा प्रश्न पडतो आहे.

श्री. सुकथनकर यांच्यासमवेत या वास्तूला भेट दिली त्यावेळी तेथे अे. के. सर्बाधिकारी नावाचे इंजिनियर तथा वास्तु-तंत्रज्ञ उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे आगळ्यावेगळ्या पद्धतीचे काम सुरू आहे. ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याकरिता जगभरातील वास्तुतज्ञांनी विचार करून ही पद्धती विकसित केली असल्याचे श्री. सर्बाधिकारी यांनी सांगितले.ते या तंत्रज्ञानात पारंगत आहेत. ते मूळचे बंगाल प्रांतातील असले तरी मुंबईत स्थायिक आहेत. कलकत्ता येथील 'टाऊन हॉल' या दोनशे वर्षापुर्वीच्या इमारतीच्या देखभालीची (सल्लागार) जबाबदारी यांच्यावर आहे. ''मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटात 'एअर इंडियाची' इमारत उध्वस्त झाली. भिंती कोसळल्या त्या पुन्हा बांधणे शक्य होते पण कॉलम आणि बीम यांना पडलेल्या भेगा का बुजवायच्या असा प्रश्न तज्ञांसमोर उभा राहिला. आम्ही हे आव्हान स्वीकारले आणि या तंत्रज्ञानानुसार त्या इमारतीचे कॉलम आणि बीम मजबुत झाले. इमारत मूळ स्वरुपात उभी राहिली'' श्री. सर्बाधिकारी मोठ्या उत्साहात सांगत होते. मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमचा डोम पावसाळ्यात गळू लागला तेव्हा याच पद्धतीने मूळ स्वरूपाला धक्का न लावता आम्ही ही गळती थांबविली असेही त्यांनी सांगितले. ते स्वत: साईभक्त आहेत.

या पद्धतीची माहिती सांगताना श्री. सर्बाधिकारी म्हणाले की ''पूर्वी खास तयार केलेल्या चुन्यात बांधकाम केले जात असे. चुना लवचिक असल्यामुळे इमारतींना तडे जात नसत. आता सिमेंटमध्ये बांधकामे केली जातात. सिमेंटमध्ये लवचिकता नसते, ते कडक होते व त्यामुळे प्रश्न निर्माण होतात. ऐतिहासिक वास्तुंची आहे ती परिस्थिती कायम ठेऊन जीर्णोद्धार करताना केवळच सिमेंट उपयोगी पडत नाही आणि चांगल्या प्रतीचा घोटीव चुना तयार करणे आता शक्य होत नाही. यावर उपाय काय करावा यावर देशभरातील मान्यवर वास्तुतज्ञांनी सखोल अभ्यास केला व काही खास पॉलिमर रसायनांची निर्मिती केली. सिमेंटमध्ये ही पॉलिमर रसायने मिसळली की सिमेंटमध्ये लवचिकता तयार होते ही या तंत्रज्ञानाची गुरूकिल्ली आहे. जुन्या इमारतींची मजबुती व आर्द्रता दर्शवू शकणारे उपकरण तयार करण्यात आले. मुंबई येथील डॉ. मांजरेकर, जे स्वत: निस्सीम साईभक्त आहेत, हे या रसायनांचे तज्ञ (मटिरियल्स स्पेशालिस्ट) आहेत तर श्री. शिरीष पटेल हे प्रख्यात स्ट्रक्चरल इंजिनियर आहेत'', मी सल्लागार या नात्याने कामावर देखरेख करीत असल्याचे त्यांनी सांगितले. सिमेंटच्या बांधकामावर पाणी मारावे लागते, पाणी न दिल्यास ते बांधकाम तडकते, परंतु या पद्धतीच्या बांधकामाला पाणी लागल्यास त्याला तडा जातो असे त्यांनी सांगितले.

साईबाबांची चावडी ५९ वर्षापुर्वीचे आपले मूळ रुप घेऊ पुन्हा चमकू लागली आहे. आधुनिक तंत्रज्ञान आपल्याला वर्तमानकाळातून पुन्हा भूतकाळाकडेही नेऊ शकते याचे हे जिवंत

उदाहरण आहे.

''साईबाबांच्या काळातील पुरातन वास्तुंचा जीर्णोद्धार करण्याची कल्पना डोक्यात होतीच परंतु योगायोगाने हे काम झटपट सुरू झाले'', श्री. सुकथनकर यांनी माहिती सांगायला सुरूवात केली. ते म्हणाले की ''समाधि मंदिराच्या कार्यालयात संगमरवरी (मार्बल) फरशी बसविण्याची इच्छा एका देणगीदाराने व्यक्त केली. त्यानुसार मी प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमचे संचालक (अलिकडेच ते निवृत्त झाले) डॉ. गोरक्षकरांबरोबर चर्चा केली. त्यांनी श्री. सर्बाधिकारी यांना शिरडीत पाठविले. त्यांनी मंदिर कार्यालयाच्या भिंतीची तपासणी केली. मंदिराखालचे तळघर तपासले आणि साईबाबांच्या समाधीला स्नानासाठी वापरत असलेले पाण्याची ओल भेगाद्वारे तळघरापर्यंत गेली असल्याचे निदर्शनास आले. मंदिराच्या भिंतीही कमकुवत झालेल्याआढळल्या. आम्ही दैनंदिन स्नानासाठी वापरत असलेले पाणी कमी केले.

वास्तुतज्ञांशी चर्चा केली. या मंडळींनी शिरडीत समक्ष येऊन समाधीमंदिर, द्वारकामाई व चावडी या ऐतिहासिक वास्तुंची पहाणी केली आणि या मूळ वास्तू आहेत तशाच ठेऊन या आधुनिक पद्धतीनुसार या वास्तुंचे मजबुतीकरण करण्याचा निर्णय घेऱ्यात आला'' असे श्री. सुकथनकर यांनी सांगितले.

''हे एक प्रकारे कलाकुसरीचे आणि जिकिरीचे व खर्चिक काम आहे. तंत्रज्ञान आधुनिक असले तरी वेळ भरपूर लागणार आहे. गैरसमजांना वाव राहू नये याकरिता सर्वांनी ही पद्धती समजावून घेणे आवश्यक आहे'', असेही त्यांनी सांगितले.

बाबांची चावडी भूतकाळाची साक्ष देऊ लागलेली असताना बाबांचे समाधीमंदिर नव्या स्वरूपात कसे दिसेल असे विचारले असता श्री. सर्बाधिकारी म्हणाले की ''नव्या स्वरूपात बाबांचे समाधीमंदिर जुने दिसू लागेल, ते त्याकाळाचे साक्षीदार होईल. बाबांच्या काळातील भिंतीचे घडीव दगड पुन्हा प्रकट होतील. चमकदार रंगाऐवजी मनाला शांती देणारे हे दगड सर्वांनाच भावतील. मार्बल, ग्रॅनाईट, साने, चांदी यापेक्षा बाबांच्या काळातील स्मृती जागृत करणारे नव्या स्वरूपातील हे जुने मंदिर सर्वांनाच शांती व प्रसन्नतेचा अनुभव देईल'' असे श्री. सर्बाधिकारी यांनी सांगितले.

ही कामे करीत असताना निघणारी माती, चुना व इतर वस्तु प्रसादासारख्या जपुन ठेवण्यात येतील व मजबुतीकरण करताना त्यांचा पुन्हा वापर करण्यात येईल असेही श्री. सर्बाधिकारी यांनी सांगितले.

**(दै. 'लोकसत्ता'च्या सौजन्याने)**

# श्री साईबाबा समाधी मंदिर परिसर योजनाबद्ध विकासासाठीच्या वास्तुशास्त्रज्ञांच्या राष्ट्रीय स्पर्धेचा वृत्तांत

**(विद्याधर ताठे, याजकडून)**

**मा**नवधर्म व विश्वबन्धुत्वाची शिकवण देणाऱ्या श्री साईबाबांचे शिरडी येथील समाधी मंदिर आज देशविदेशातील भाविक भक्तांचे श्रद्धास्थान झालेले असून सध्या रोज सरासरी ३० ते ४० हजार भाविक शिरडीस भेट देत आहेत. विशेषत: गुरूवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी ही संख्या बरीच वाढते आणि उत्सवकाळात तर ती तीन लाखांपर्यंतही पोहोचते. भक्तीभावाने श्री बाबांचे दर्शनास प्रचंड संख्येने येणाऱ्या व श्रद्धा-सबुरीने रांगेत तिष्ठत राहणाऱ्या या भाविकभक्तांची निदान दर्शनाची व्यवस्था योग्यप्रकारे व सोयीस्करपणे शक्यतो समाधी मंदिर परिसरातच करणे हे आपले आद्य कर्तव्य समजून संस्थानच्या विद्यमान व्यवस्थापन मंडळाने समाधी मंदिर परिसराचा सर्वांगिण, आधुनिक सोयीसुविधांनी सुसज्ञ आणि योजनाबद्ध पद्धतीने विकास करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचा एक भाग म्हणून संस्थानतर्फे वास्तुशास्त्रज्ञांची अखिल भारतीय पातळीवर एक खुली स्पर्धा आयोजित करून परिसर विकासाची कल्पनाचित्रे व मॉडेल्स निमंत्रित करण्यात आली होती.

श्री साईबाबांच्या वास्तव्याने पूनित झालेल्या सर्व वास्तूंचे जसेच्या तसे जतन आणि येणाऱ्या भाविक भक्तांना आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करून देणे ही दोन प्रमुख उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेवून समाधी मंदिर परिसराच्या योजनाबद्ध विकासासाठी निमंत्रित केलेल्या वास्तुशास्त्रीय खुल्या स्पर्धेसाठी राष्ट्रीय पातळीवर वृत्तपत्रात जाहिरात देऊन मान्यवर व सक्षम वास्तुशास्त्रज्ञांकडून कल्पनाचित्रे व मॉडेल्स मागविण्यात आली. संस्थानच्या आवाहनास भारतातील सर्व प्रांतातून व भागातून उत्तम प्रतिसाद मिळाला.

या खुल्या स्पर्धसाठी एकूण ४९ प्रवेशिकांसह दाखल झालेल्या 'कल्पनाचित्रे व मॉडेल्स'च्या भल्या मोठ्या लाकडी पेट्यांनी संस्थानच्या मुंबई कालर्यालयातील २ खोल्या भरून गेल्या होत्या. महाराष्ट्रातून २३, उत्तर प्रदेशातून १५, मध्य प्रदेशातून ४, पश्चिम बंगालमधून १, तामिळनाडूतून २, कर्नाटकातून १, आंध्रमधून १, ओरिसातून १ आणि गुजरातमधून १ याप्रमाणे देशातील विविध भागातून या प्रवेशिका प्राप्त झालेल्या होत्या. यावरून स्पर्धेस मिळालेल्या उत्तम प्रतिसादाची कल्पना येते. महाराष्ट्रातून प्राप्त झालेल्या २३ पैकी ११ प्रवेशिका मुंबईतून, ७ पुण्यातून, तर नागपूर, नाशिक, कोल्हापूर, ठाणे, डोंबिवली येथून प्रत्येकी १ याप्रमाणे प्रवेशिका मिळाल्या होत्या.

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे ही स्पर्धा 'इंडियन इन्स्टिटयूट ऑफ आर्किटेक्टस्' आणि 'कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर' या वास्तुशास्त्रज्ञांच्या मध्यवर्ती व्यावसायिक संघटनांनी ठरवून दिलेल्या सर्व अटी व कार्यपद्धती काटेकोरपणे पाळून भरविण्यात आली होती. या स्पर्धेसाठी संस्थानला 'व्यावसायिक सल्लागार' म्हणून मुंबई येथील वास्तुशास्त्रज्ञ श्री. अनिल नागरथ यांनी संपूर्ण जबाबदारी घेऊन सहकार्य केले. स्पर्धेचे परिक्षक म्हणून इंडियन इन्स्टिटयूट ऑफ आर्किटेक्टस्‌चे माजी अध्यक्ष प्रा. माधवराव देवभक्त, मुंबईतील प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालयाचे अलिकडेच निवृत्त झालेले संचालक श्री. सदाशिव गोरक्षकर आणि मुंबईच्याच 'मुंबई हेरिटेज कॉन्झर्वेशन समिती'च्यासदस्या असलेल्या प्रसिद्ध वास्तुशास्त्रज्ञ, श्रीमती ब्रिन्दा सोमया या मान्यवर तज्ञांनी संस्थानला आपला किंमती वेळ व बहुमोल मार्गदर्शन देऊन स्पर्धेचे 'व्यावसायिक पालकत्व' सांभाळले. या स्पर्धेसाठी प्राप्त झालेल्या ४९ प्रवेशिकांचे दोन-अडिच दिवस काळजीपूर्वक मूल्यमापन करून त्यांनी आपला निकाल दिला.

स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व वास्तुशास्त्रज्ञांना स्पर्धेच्या अटींबरोबरच संस्थानतर्फे एक व्हीडीओ कॅसेट व शिरडी परिसर व संस्थानची तपशिलवार माहिती देणारी पुस्तिका देण्यात आली होती. या पुस्तिकेद्वारे शिरडीतील बारा महिन्यांचे हवामान-पाऊस, भक्तांची वर्षभर येणारी महिनावार सरासरी संख्या, बाबांच्या स्पर्शाने पावन झालेल्या व ज्यांना मूळरूपातच जतन करावयाच्या अशा वास्तुंची यादी (बुट्टीवाडा - समाधी मंदिर, दिक्षितवाडा, द्वारकामाई, गुरूस्थान, चावडी, लेंडीबाग इ.), मंदिरात होणाऱ्या दैनंदिन कार्यक्रमांची व उत्सवातील कार्यक्रमांची सचित्र व साद्यंत माहिती, भक्तांची होणारी गर्दी, रांगेची सध्याची पद्धत, परिसरातच नित्य होणाऱ्या अभिषेक, सत्यनारायण पूजा यांसह पारायण, ध्यान मंदिर, उदी तयार करणे, प्रसाद वाटप, बाबांना अर्पण केलेल्यावस्तुंची लिलावाने होणाऱ्या विक्रीसाठी जागा, देणगी कक्ष, बाबांच्या वस्तू व दस्तऐवज साहित्याचे वस्तुसंग्रहालय यासारख्या आवश्यक बाबींसाठी लागणारी पुरेशी जागा शिवाय टेलिफोन-फॅक्स, पिण्याचे पाणी, अल्पोपहार वितरण, प्रसाधनगृहे, बँक कक्ष, पादत्राणे ठेवण्यासाठीची सोय आदी सार्वजनिक आवश्यक सेवा सुविधांची गरज व त्यासाठीं योग्य जागेची तरतूद या सर्व गोष्टींची माहिती या पुस्तिकेद्वारे वास्तुशास्त्रज्ञांना करून देण्यात आली होती. त्याचबरोबर मंदिर परिसराच्या चार दिशांना चार आकर्षक प्रवेशद्वारें उभारण्याच्या संकल्पनेचाही विशेष उल्लेख करण्यात आला होता. तसेंच श्री साईबाबांची साधेपणाची राहणी व त्यांची साधेपणाची आवड, त्या काळातील वास्तुरचनांची वैशिष्ट्ये, आणि शिरडी परिसरातील एकूण वातावरण व इमारती या सर्वांना संयुक्तिक ठरेल अशाच कल्पनाचित्रांचा व मॉडेल्सचा आग्रह संस्थानद्वारे स्पष्टपणे सर्वांना कळविण्यात आला होता. बहुतेक सर्व वास्तुशास्त्रज्ञांनी या अटी व आवश्यक सोई-सुविधांचे भान ठेवूनच आपापली मॉडेल्स व कल्पनाचित्रे तयार करून सादर केली.

दि. ३१ जुलै ही प्रवेशिकांची अखेरची मुदत संपताच दि. ५ ते ७ ऑगस्ट असे तीन दिवस परिक्षकांनी आलेल्या सर्व प्रवेशिकांचे (मॉडेल्स व कल्पनाचित्रांचे) बारकाईने मूल्यांकन केले आणि दि. ७ ऑगस्ट रोजी पत्रकारपरिषदेत स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक प्राप्त प्रवेशिकांसमवेतची बंद पाकिटे फोडून विजेत्यांची नावे घोषित केली. नंतर दि. ८ ते ११ ऑगस्ट, सर्व प्रवेशिकांचे (मॉडेल्स व कल्पनाचित्रांचे) दादरच्या पारशी कॉलनीतील मंचेरजी जोशी सभागृहात आम जनतेसाठी व साईभक्तांसाठी विनामूल्य प्रदर्शन भरविण्यात आले. तीन दिवसात साईभक्तांनी मोठ्या संख्येने येऊन प्रदर्शन पाहून आनंद व्यक्त केला. या प्रदर्शनास साईभक्तांनी केलेली गर्दी पाहता साईभक्तांमध्ये शिरडीच्या योजनाबद्ध विकासाची केव्हढी उत्सुकता आहे हे दिसून आले.

या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक स्पर्धकास संस्थानचा पत्ता असलेले कोरे पाकिट पाठविण्यात आले होते. त्या पाकिटावर आपल्याला नमूद करावासा वाटेल असा कोणताही सहा आकडी नंबर टाकून स्पर्धकाने ते पाकिट, प्रवेशिका (मॉडेल्स-कल्पनाचित्र) समवेत पाठवायचे होते. केवळ या बंद पाकिटातच स्पर्धकाने आपले नाव-पत्ता लिहून ठेवायचा, त्याशिवाय अन्यत्र कोठेही ओळखवजा कोणतीही खूण वा उल्लेख न करता प्रवेशिका पाठविणे बंधनकारक होते. परिक्षकांनी सर्व मॉडेल्स व कल्पनाचित्रे पाहून प्रथम-द्वितीय-तृतीय पारितोषिकांसाठीची मॉडेल्स व कल्पनाचित्रे निवडली तेव्हा त्यांना केवळ कोणत्या नंबरच्या मॉडेल्स-कल्पनाचित्रांना

पारितोषिके प्राप्त झाली ते नंबरच तेव्हढे माहित होते. प्रथम, द्वितीय, तृतीय पुरस्कार प्राप्त विजेत्या मॉडेल्स-कल्पनाचित्रांसमवेतची ३ बंद पाकिटे परिक्षकांनी पत्रकारपरिषदेत फोडली तेव्हाच सर्वांना पुरस्कार विजेत्यांची नावे समजली. अशाप्रकारे ही स्पर्धा अगदी निःपक्षपाती व तटस्थपणे पार पडून निखळ गुणवत्तेच्या आधारे पारितोषिकांसाठी निवड करण्यात आली.

या स्पर्धेत पुढील विजेत्यांना पुरस्कार प्राप्त झालेले आहेत –

**प्रथम पुरस्कार** (रु. १,५०,०००) : माथुर-काप्रे असोसिएटस्, नवी दिल्ली.
संचालक - श्रीमती सोनिया काप्रे
श्री. उदय काप्रे
श्री. मनोज माथुर

**द्वितीय पुरस्कार** (रु. १,००,०००) : श्री. विवेक वर्मा, नवी दिल्ली.

**तृतीय पुरस्कार** (रु. ५०,०००) : श्री. कैलास सावंत, मुंबई.



**स्पर्धेतील प्रथम पुरस्कार विजेते मॉडेल.**

स्पर्धेसाठी आलेल्या प्रवेशिकांचे (मॉडेल्स व कल्पनाचित्रे) शिरडी येथेही सर्व ग्रामस्थ व साईभक्तांसाठी दि. ३१ ऑगस्ट पासून पुढे ५ दिवस प्रदर्शन भरविण्यात आले.

''स्पर्धेत प्रथम आलेल्या मॉडेल्सच्याआधारावर पुढील विचार सत्वर करून लवकरात लवकर त्याला मूर्त स्वरूप देण्याकरिता कार्यारंभ करण्याचा संस्थानच्या विश्वस्त मंडळाचा संकल्प असून शक्यतो आमच्या कालावधीतच हे कार्य पूर्ण करण्याची आमची इच्छा आहे'' असे संस्थानचे अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर यांनी मुंबईतील पत्रकारपरिषदेत पत्रकारांना सांगितले.

## दृष्टिक्षेपात स्पर्धा

| | |
|---|---|
| जानेवारी ९६ | विविध राष्ट्रीय वृत्तपत्रांमध्ये स्पर्धेविषयीचे प्रकट आवाहन संस्थानतर्फे प्रसिद्ध. |
| १० फेब्रुवारी ९६ | स्पर्धेचे फॉर्मस् (मोफत) मागविण्याची अंतिम तारीख. *(स्पर्धेच्या २४९ फॉर्मस्साठी मागणी आली. ते सर्व पोष्टाने पाठविण्यात आले.)* |
| २९ फेब्रुवारी ९६ | फॉर्मस् पूर्ण भरून रु. ५०० च्या डी.डी.समवेत मिळण्याची अंतिम तारीख. *(५०० रु.च्या डी.डी.समवेत स्पर्धेत १८६ स्पर्धकांनी भाग घेतला. त्यांना प्रत्येक एक कॅसेट व एक माहिती पुस्तिका पाठविण्यात आली व अभ्यास-चिंतन करण्यास १ महिन्याचा वेळ देण्यात आला.)* |
| १३-१४ मे ९६ | कॅसेट पाहून व पुस्तिका वाचून स्पर्धेबद्दल निर्माण झालेल्या शंका/प्रश्न स्वीकारून त्यांना सविस्तर उत्तरे व माहिती देण्यात आली. *(प्रश्न कोणाही स्पर्धकाने केलेला असला तरी उत्तरादाखलची माहिती सर्वांनाच पाठविण्यात येऊन सर्वांना समान माहिती उपलब्ध करून देण्यात आली. प्रवेशिका (मॉडेल्स-कल्पनाचित्रे) पाठविण्यास ३१ जुलै अंतिम तारीख देण्यात आली.)* |
| ३१ जुलै ९६ | स्पर्धेसाठी भारताच्या विविध प्रांतातून एकूण ४९ प्रवेशिका मॉडेल्स व कल्पनाचित्रासह दाखल झाल्या. |
| ५ ते ७ ऑगस्ट ९६ | प्रवेशिकांचे (मॉडेल्स व कल्पनाचित्रांचे) मान्यवर परिक्षक श्री. देवभक्त, श्री. गोरक्षकर, श्रीमती सोमया यांच्याकडून मूल्यांकन. |
| ७ ऑगस्ट ९६ | सायंकाळी पत्रकारपरिषदेत स्पर्धेतील विजेत्यांची नावे घोषित करण्यात आली. |
| ८ ते ११ ऑगस्ट ९६ | मॉडेल्स व कल्पनाचित्रांचे सर्व भक्तांसाठी विनामूल्य प्रदर्शन दादरच्या मंचेरजी जोशी हॉलमध्ये भरविण्यात आले. |
| ३१ ऑगस्ट ९६ | शिरडी येथे मॉडेल्स-कल्पनाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन आणि स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न. *(प्रदर्शन १ सप्टेंबर ते ५ सप्टेंबरपर्यंत भक्तांसाठी खुलें.)* |

**('श्री साईलीला'च्या सौजन्याने)**

# श्री साईबाबा
# संतशिरोमणि नव्हे तर युगावतार !

- चकोर आजगांवकर, ठाणे.

— ❖ ❖ ❖ —

*श्री साईबाबांच्या जीवन, चरित्र, चमत्कार व उपदेशावर मी गेली पंचवीस वर्षे सातत्याने लेखन चिंतन करीत असलो तरी श्री साईबाबा तुम्हाला सर्वप्रिय का या प्रश्नाचे उत्तर देताना मी पुन्हा एकवार गूढ चिंतनात आणि मौनात विरेन. कारण साईबाबा हे केवळ एक व्यक्ति नाहीत, तर गुरूशक्ति आहेत; ते संत नाहीत, तर अवतारी युगपुरुष आहेत. त्यांनी केवळ भागवत संतांची ज्ञानभक्तिकर्मयोगावर आधारलेली धर्मध्वजा उभारली नाही, तर वैदिकांची जड यांत्रिकता आणि भागवतांची भावभक्ति याहून स्वतंत्र अशी सिद्धकृपेची, प्रेमकरुणेची आणि मानवतेची उषा या भारताच्या धार्मिक क्षितिजावर धर्मपंथजातिविहीन आगळ्या शैलीने प्रकाशमान केली आहे.*

— ❖ ❖ ❖ —

श्री साईबाबा मला आवडतात, कारण ते साहित्यिकांच्या व प्राध्यापकांच्या सांकेतिक वाङ्‌मयीन भाषेच्या पलीकडले आहेत. त्यांच्या एखाद्या ग्रंथाची वाङ्‌मयीन, धार्मिक वा तत्त्वज्ञानदृष्ट्या चिकित्सा करता येणार नाही. ज्ञानेश्वर एकनाथासारख्या ज्ञानी व लोकाचारात वर्तणाऱ्या संतधर्म-प्रवर्तकात ते बसणार नाहीत. हिमालयात घोर तपश्चर्या करणाऱ्या व लोकापासून दूर वसणाऱ्या सिद्धमहात्म्यातहि ते मोडणार नाहीत. चिदंबर दीक्षितासारखे ते गृहस्थाश्रमी वेदवेदांत व शास्त्रशुद्ध कर्ममार्गाचा प्रसार करणारे शिवयोगी नाहीत, की स्वामी समर्थ, तुकाई (गोंदवलेकर गुरू) यांसारखे बालोन्मत्तपिशाच महायोगीहि नव्हेत. विक्षिप्तपणा, परोक्षप्रियता, लोकोद्धारक चमत्कारशीलता यामुळे ताजुद्दिन, हाजीमलंग या सिद्ध अवलियांशी त्यांचे नाते जुळवता आले, तरी त्यांच्या प्रचंड मानवताभिमुख आणि लोकसंग्रहकारी कार्याकडे पहाता, त्यांच्या अवतारीत्वाशी कोणत्याहि पूर्वकालिन संत महात्म्याशी त्यांची तुलना होऊ शकत नाही. बाबांचे भारतीय संतपरंपरेत एक आगळेवेगळे, लोकविलक्षण, लोकोद्धारक, प्रपंचविन्मुख पण भक्तसंग्राहक भक्तप्रपंचतारक असे मानवतावादी आणि समतावादी स्थान आहे. या अद्वितीय अशा तेजोमय स्थानामुळेच बाबा मला एक संत नव्हे, तर युग अवतार म्हणून भावतात आणि प्राणाहून प्रिय वाटतात.



श्री साईबाबा मला आवडण्याचे दुसरे कारण हे की साधकांना त्याज्य समजल्या जाणाऱ्या चमत्कारांचा आणि सिद्धिसामर्थ्याचा बाबांनी लोकांच्या कल्याणासाठी आणि प्रबोधनासाठी अत्यंत विपुलतेने आणि मुक्तहस्ताने वापर केला. आपण जे साईबाबांना जाणतो, ओळखतो आणि त्यांच्यावर प्रेम करतो, ते त्यांच्या या चमत्कार लाघवामुळेच ! त्यांचे हे लाघव जात-धर्म-पंथ-देश-प्रांत यांच्या सीमा ओलांडून सर्वत्र लीलारूपाने बहरले. श्री बाबांच्या जीवनात चमत्कार होते, यामुळेच त्यांचे सर्वस्पर्शित्व, सर्वदर्शित्व आणि

सर्वशक्तिमत्व दिशाकाळाच्या सीमा सहज ओलांडीत असे आणि आपल्या दैदीप्यमान तेजाने प्रकाशमान होत असे! त्यांच्या दृष्टीपुढे सारे वर्तमान, भूत आणि भविष्य म्हणजे एक उघडे पुस्तक बने. त्यांचा संकल्प सारी सृष्टी विनयाने झेलीत असे व आकाराला आणीत असे. आपल्या सर्वशक्तिमान चैतन्यरूप विश्वात्मकतेचे भान ठेवूनही श्री साईबाबा सामान्य जनासमोरही अगदी जनसामान्यासारखे वर्तत. सज्जनावर प्रेम करीत, दुर्जनांना फटकारीत, भाविकांची श्रद्धा न मोडता, ती ते पुष्ट करीत. त्यांनी प्रापंचिकांच्या तक्रारी सिद्धिसामर्थ्याने निवारण केल्या. चमत्काराच्या अंजनाने त्यांनी सांसारिकांना परमार्थाची दृष्टी दिली. क्षुद्र स्वार्थासाठी जवळ आलेल्यांनाही न धिक्कारता त्यांच्या आत्मकेंद्रितेला श्रद्धा सबुरीची किनार जोडली. बाबांचे कल्पवृक्षत्व पाहून स्वार्थाचे रूपांतर जिज्ञासेत, तितीक्षेत आणि शरणागतीत झाले. ज्ञानोदय झाला. लोकोद्धाराचे महाध्येय त्यांनी व्याख्याने, प्रवचने न देता, कृती व प्रत्यक्ष अनुभव याद्वारे रूजविले. भक्तांचा ओघ आकर्षित झाला व त्यांची लोकप्रियता दिगंत पसरली. आर्त अर्थार्थी जनातन मुमूक्षू ज्ञानी भक्त निर्मावयाची ही दिव्य किमया.

श्री साईबाबा मला आवडण्याचे तिसरे कारण ते लौकीकापलिकडचे अलौकिक चैतन्य होते. युगायुगातून भक्तांच्या हाकेला 'ओ' देत प्रगटत होते. कधी कबीर तर कधी साई! त्यांचे विलक्षणत्व जगातील त्यांच्या राहणी आणि करणीमधील विरोधाभासातून स्पष्टपणे प्रतीत होत असे. आकाश मातीला भिडलेले आणि मृण्मयता स्वर्गाला स्पर्शलेली दिसण्याचा चमत्कार त्यांनी शिरडी च्या धुळीत सामान्यजनाप्रमाणे वावरताना घडविला! त्यांचे घरदार, नांवगाव, मातापिता, वंशकुळ कुणाला ज्ञात नव्हते, परंतु सारे विश्वच त्यांचे घर होते, सारी मानवता त्यांना लेकरासारखी होती. त्यांना नांव नव्हते, परंतु सर्व नांवे त्यांचीच होती. एका जागी बसून ते विश्वाला स्पर्श करीत, मशिदीत त्यांनी मंदिर उभारले होते. धुनी पेटवून अग्निपूजेचे व्रतही त्यांनी सांभाळले होते. हिंदु, मुस्लिम, सुफी, नाथ, दत्त व कबीर पंथांची सारी गणवैशिष्ट्ये त्यांच्या राहणी, करणी व जबानीतून व्यक्त होत होती. ते भिक्षा मागत, पण लक्ष्मी त्यांची दासी होती. ते रुद्रावतार धारण करीत पण संयमाची मूर्ति होते. दक्षिणा मागतही पण कपर्दिकसुद्धा स्वतःजवळ बाळगीत नसत. ते व्याख्याने देत नसले, तरीत यांचा एक एक शब्द म्हणजे वेदांताचे सार बने! ते वैराग्याची मूर्ति असूनही त्यांच्या हृदयात प्रेम-करूणेचा झरा अखंड झुळझुळत वहात होता. प्रपंचविन्मुख असूनही त्यांनी भक्त प्रपंचभार सांभाळला होता. ते मृत्युंजय होते तरीही त्यांनी एका भक्ताचा मृत्यू स्वतः स्वीकारला. असा अलौकिक विरोधाभास मी इतर संतांच्या जीवनात प्रकर्षाने पाहू शकत नाही. यामुळेच बाबा माझ्या प्रीतिपटलावर आणि हृदयावर पूर्णपणे कोरलेले आहेत; ठसलेले आहेत!

श्री साईबाबांचे इतर भागवत व अपारंपारिक संत अवलियांशी असलेल्या साम्यभेदाची वरील परिच्छेदात मुलभूत व मार्मिक चर्चा केलेली आहे. आता बाबा ज्या आगळ्या शिकवणुकीमुळे मला प्रिय आहेत, त्या चवथ्या कारणाचा मी ऊहापोह करणार आहे. बाबांनी मोठाल्या ग्रंथाची निर्मिती केली नाही. त्यांचा उपदेश मिताक्षरी व भारतीय भागवत, सुफी, कबीर, दत्त आणि नाथ तत्त्वज्ञानाचे मर्म अल्पाक्षरात सांगणारा आहे. माझ्या सुप्रसिद्ध **'श्रीसाईगीतायन'** व **'श्रीसाईजीवनकथे'**त मी याचा स्वतंत्र काव्य व नाट्यस्वरूपात आविष्कार केला आहे व तो मराठी, इंग्रजी व हिंदी या तिन्ही भाषाभगिनीत मांडण्याची सुसंधि मला मिळाली. श्रीसाईगीतायनाची निर्मिती अत्युच्च कृपाअनुभवांच्या शृंखलेतून झालेली असल्याने तो स्वतंत्र विषय आहे. माझ्या योग व ज्ञानमार्गीय साधनेचे रूपांतर बाबांनी अनंत अनुभवांद्वारे ईश्वरार्पणकर्माच्या कर्मयोगात व स्थिर भावावर आधारलेल्या आर्तभक्तीत केला, या माझ्या प्रत्यक्ष जीवनचरित्रातील हा चमत्कार प्रत्ययकारी आहे. बाबांनी सात्त्विकता, सन्मार्ग, नैतिक जीवनाला उचलून धरले, ऋण-हत्या-वैर टाळणे, नेकीने वागणे, मानवतेची सेवा हाच कर्ममार्ग असल्याचे त्यांनी रूजविले. भूतांत भगवंत पहावयास त्यांनी शिकविले. नाथ, कबीर, दत्त व सुफी पंथातील गुरूभक्ती हीच प्रभुभक्ति, हे तत्त्व त्यांनी भक्तमनांत ठसविले. नामस्मरणाहून श्रेष्ठ गुरूध्यानाचा गुरुगीतेतील नाथमार्ग त्यांनी प्रसारिला **"ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः" "(You look to Me and I will look up to you.)"** गुरूध्यानातून गुरूरूप होणे, गुरूच्या परमज्योतीत जीवाची ज्योत मिळविणे व गुरूकृपेद्वारे प्राणमनाचा लय करून समाधी गाठणे, हे त्यांनी शिकविले आहे. त्यांच्या कृपेचा व ज्ञानाचा हा थेट मार्ग आहे.

श्री बाबांची मला आवडणारी सर्वोत्तम गोष्ट म्हणजे, त्यांच्या शिकवणीस शब्दांचे एकमेव माध्यम नव्हते. प्रसंग, दृष्टांत, अनुभव, जीवसृष्टी, वृक्षवल्लरी हे सारे त्यांच्या शिक्षणाचे विशाल माध्यम होते. प्रेम, तितीक्षा व श्रद्धा (श्रद्धा, सबुरी, समर्पण) यांचा कृतीशील कर्तव्याचा मार्ग त्यांनी शब्दातील अनुभवातून प्रसारिला. जात-धर्म-पंथ यांचे कृत्रिम मानवनिर्मित भेद त्यांनी तोडले. खंडोबाच्या मंदिराच्या द्वारा म्हाळसापतींसमक्ष त्यांनी देव मशिद व मंदिरात रहात नसून भक्तांच्या हृदयातील भक्तीत व सेवेच्या कर्मात वसतो, ही दिव्य घोषणा केली.



# परमाचार्य

**– रंगनाथ मिश्र**

(भारताचे माजी सरन्यायाधीश)

— ❖ ❖ ❖ —

*भारताचे माजी सरन्यायाधीश श्री. रंगनाथजी मिश्र यांनी कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य स्वामी चंद्रशेखर सरस्वती यांच्याबद्दल व्यक्त केलेली आदरांजली.*

— ❖ ❖ ❖ —

१९३६ सालातील उन्हाळ्यातील दिवस !

उत्तर भारताची आपली विजययात्रा यशस्वीरित्या पूरी करून कांचीचे परमाचार्य लवाजम्यासह कांची येथील आपल्या मठाकडे पदभ्रमण करीत निघाले आहेत अशी बातमी पसरली. लवाजम्यामध्ये अनेक विद्वान पंडित, धर्मगुरू, मठवासी, मठाधिकारी, हत्ती, अनेक गायी यांचा समावेश होता व त्यांनी नवीन ओरिसा प्रांताचा बराचसा भाग व्यापला आहे अशीही बातमी सर्वत्र पसरली. महाराज ओरिसामध्ये येणार हे कळताच तो एक सर्वांच्या चर्चेचा विषय बनला.

संचारी देव (भूदेव) म्हणून सर्वांना परिचित असलेल्या जगद्गुरूंनी पुरीस भेट दिली व श्री जगन्नाथ देवतेचे दर्शन घेतले. कांही दिवसांनी त्यांनी दक्षिणेकडे प्रयाण केले.

मी तेव्हां फक्त ९ वर्षांचा होतो. परंतु माझे मोठे बंधु (रघुनाथजी, जे आज हयात नाहीत) कॉलेजमध्ये शिकत होते. मठातील कार्यालयीन कर्मचाऱ्यांशी त्यांचा पत्रव्यवहार होत असे. चिलका तलावाच्या पश्चिमेस बालूगांव नांवाचे एक महत्वाचे ठिकाण आहे. येथे आमच्या खेडेगांवापासून एक रस्ता निघून हमरस्त्यास मिळतो. बालूगांव येथे महाराज साधारणपणे केव्हां येणार याविषयी माझे बंधूंना माहिती मिळाली. मी व माझे बंधू दुपारी ३ वाजतां वरील ठिकाणी पोहोचलो आणि महाराजांच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहू लागलो. बरोबर तासानी परमाचार्य व त्यांच्याबरोबरचा ताफा तेथे येऊन दाखल झाला. जगद्गुरूंची मुद्रा तेजस्वी आणि प्रसन्न होती. दीर्घ वाटचाल आणि तीव्र उन्हाचा चटका यांचा त्यांच्या चेहेऱ्यावर किंचितही परिणाम दिसत नव्हता. आणि म्हणूनच त्यांचा परिचय करून देण्याची आवश्यकता वाटत नव्हती. कारण बरोबर असलेल्या इतर सहकाऱ्यांपासून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वेगळेपण अगदी स्पष्टपणे जाणवत होते.

रणरणत्या उन्हाने तापलेल्या त्या भरदुपारच्या उन्हात, शेकडो लोकांनी मोठ्या भाविकतेने जगद्गुरूंना साष्टांग नमस्कार घातला. लहान मुलांमुलींनी फुले उधळून त्यांचे स्वागत केले. स्त्रियांनी स्वागतपर पद्ये (मांगलिका) म्हटली. स्थानिक धर्मगुरूंनी शुभसूचक शंखनादपण केला. काही क्षणातच सर्व वातावरण उत्साहमय आणि पवित्र झाले. माझे बंधू त्यावेळी २० वर्षांचे होते. गर्दीतून वाट काढीत ते थेट परमाचार्यांपर्यंत पोहोचले आणि त्यांच्याबरोबर संस्कृतमध्ये बोलू लागले. खेड्यातील रहिवासी असून संस्कृतमध्ये संभाषण करण्याचे प्राविण्याबद्दल महाराजांना माझ्या भावाचे विशेष कौतुक वाटले.

माझे बंधू एकटेच आले आहेत काय आणि पुन्हा ते बालूगावला केव्हां जाणार आहेत हे जाणून घेण्याची महाराजांची इच्छा होती. या प्रश्नास उत्तर म्हणून की काय माझे बंधूंनी माझा परिचय करून दिला आणि मला काही कल्पना न देतांच महाराजांच्या बरोबर आपण जाणार आहोत असे सांगितले.

महाराजांच्या बरोबर आम्ही जाणार असून आठवड्यानंतर परत येऊ असा निरोपही गांवात रहाणाऱ्या आमच्या शेजाऱ्याबरोबर पाठविला. अंगावरील कपड्यानिशी व मैलोगणीक पायी चालण्याची आणि खाण्यासाठी जे मिळेल त्यावर समाधान मानण्याची आम्ही मनाची तयारी केली. अर्थात यात विशेष असे

काहीच नव्हते ! कारण आमच्या गांवी परत जावे लागले असते तरच आमची घोर निराशा झाली असती आणि आमचा विरस झाला असता.

तीन दिवसांनी आम्ही छत्रपूर गांवी (सध्याचे गंजाम जिल्ह्याच्या मुख्य कचेरीचे ठिकाण) पोहोचलो. गांवातील सुखवस्तू संस्कृत पंडिताने त्यादिवशी सायंकाळी 'श्रीपाद्यपूजा' आयोजित केली होती. कार्यक्रमास जाण्याच्या वेळेस परमाचार्यांनी माझ्या बंधूंना बरोबर घेतले व आम्ही दोघेही बंधू महाराजांच्या बरोबर गेलो. पूजा संपन्न झाल्यानंतर पंडितांची सभा आयोजित केली होती. याची महाराजांना पूर्वसूचना नव्हती परंतु स्मित वदनाने तेही त्यांत सामील झाले. श्लोक पठणाच्यास्पर्धा सुरू झाल्या. आणि तो कार्यक्रम संपल्यानंतर रात्री ९ वाजता आम्हांस भोजन देण्यात आले. बरोबर १० वाजतां महाराजांनी माझ्याबंधूंचा शोध घेतला आणि ते आल्यानंतर दोघांची धार्मिक ग्रंथ आणि वैदिक वाङ्मयावर चर्चा सुरू झाली. मी जवळच बसलो होतो. परंतु डोळे पेंगुळले असल्याने थोड्याच वेळात जमिनीवरच मी झोपी गेलो. महाराजांच्या बरोबर असणाऱ्या शिष्यांनी पहाटे बरोबर साडेचार वाजता आम्हांस उठवले. महाराजांची धार्मिक नित्यक्रमाची वेळ झाली आहे असे त्यांनी सांगितले.

(पुढे १९९०चे एप्रिल महिन्यात जेव्हा मी कांचीपूरमला गेलो. माझे बंधू मार्च महिन्यात स्वर्गवासी झाले ही बातमी मी महाराजांना सांगितली. परमाचार्यांना बहुधा ही घटना माहितच असावी. थोड्या वेळानी त्यांनीआम्हास भूतकालातील वरील घटनेची आठवण सांगितली. छत्रपूर येथील त्या दिवसाठी आठवण अतिसुंदर होती. "या रात्री आम्ही (परमाचार्य व माझे बंधू) झोपलोच नाही इतके दोघेजण चर्चेमध्ये रमून गेलो होतो." असे स्वामी म्हणाले.)

जगद्‌गुरूंनी बेहरामपूर येथे चातुर्मासासाठी मुक्काम केला आणि आम्ही आमच्या गांवी बनपूरला परतलो. माझे बंधू महाराजांशी पत्रव्यवहार करीत असत आणि त्यांना महाराजांकडून पत्रोत्तरे येत असत. कांही प्रसंगी आम्ही जगद्‌गुरूंचे दर्शनासाठीही जात असू. मात्र आपल्या मुलाच्या मनांत कदाचित् संन्यास घेण्याची भावना निर्माण होईल या भीतीने आपल्या मुलाने महाराजांच्या सान्निध्यात फार राहू नये, असे आमच्या मातोश्रींना वाटत असे !

कालांतराने मी मोठा झालो. माझा अभ्यासक्रम मी पूर्ण केला. आणि कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी मी 'लॉ कॉलेज'मध्ये दाखल झालो.

### स्वामींचे द्रष्टेपण-दिव्यदृष्टी

१९५८च्या उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही कोडाई कॅनॉल येथे गेलो होतो. तेथून परत येताना मदुराई येथे मुक्काम केला. जगद्‌गुरूंचा मुक्काम जवळच इलायतगुडी येथे आहे असे आम्हांस समजल्यावर लगेच महाराजांचे दर्शनासाठी जाण्याची आम्ही तयारी केली.

इलायतगुडी येथे जी घटना घडली ती खरोखरीच वर्णनातीत आहे. आम्ही इलायतगुडीस येणार याची जणू महाराजांना कल्पना होती. आमच्यासाठी प्रसादांच्या ८ केळीच्या पानांची त्यांनीव्यवस्था केली होती. मोजकेच पण महत्वाचे प्रश्न विचारून त्यांनी आमची विचारपूस केली.

आम्ही रामेश्वर येथे जाणार आहोत असे जेव्हा आम्ही महाराजांना सांगितले, तेव्हा भयंकर वादळापासून सावध रहाण्याची त्यांनीआम्हांस सूचना केली. "आम्ही रामेश्वरचा बेत रद्द करावा काय ?" असे विचारले असता, दोन वर्षांपूर्वी मातोश्रींना घेऊन आम्ही रामेश्वरला निघालो असतांना कुटुंबातील एकाची तब्येत अचानक बिघडल्यामुळे आम्हांस तो बेत रद्द करावा लागला, या घटनेकडे महाराजांनी आमचे लक्ष वेधले. म्हणून यावेळी रामेश्वरचा प्रवास आम्ही चालू ठेवण्याविषयी महाराजांनी सांगितले. आम्हा सर्वांना आशिर्वाद दिला आणि मग मात्र आता मार्गातील येणारे कोणतेही अडथळे आपण पार करू शकू असा आम्हास दृढ विश्वास वाटू लागला.

महाराजांचे सहवासात आम्ही जवळजवळ १ तास होतो. मी आणि माझी पत्नी आम्ही दोघेही जणू भारले गेलो होतो.

दुसऱ्या दिवशी रामेश्वर येथे जी घटना घडली त्यामुळे आम्ही मनोमन महाराजांच्या चरणी लीन झालो. रामेश्वर येथे मुक्काम करण्यासाठी जे ठिकाण महाराजांनी सूचित केले होते तेथील व्यवस्थापकांनी आम्हांस सांगितले की, आदल्या दिवशी सायंकाळी कॉफी घेत असताना (याच वेळी महाराजांनी रामेश्वर येथील मुक्कामाचे ठिकाण सुचविले होते) आम्ही रामेश्वरला त्यांच्याकडे मुक्कामास येणार आहोत हे अंतर्ज्ञानाने समजले होते.

१९५८ पासून कांचीपूरमशी माझे संबंध दृढ झाले आणि मग मात्र मी दरवर्षी किमान तीन वेळा तरी महाराजांच्या दर्शनास जाण्याचा परिपाठ ठेवला. प्रत्येक वेळी अढळ श्रद्धा, अधिक प्रेम व महाराजांचे कृपाशिर्वाद घेऊनच मी परत येत असे.

सन १९६८ मधील महालया अमावस्येच्या दिवशी सूर्यग्रहण होते. परमाचार्यांचा मुक्काम त्यावेळी विजयवाडा येथे होता. आम्हाला त्यांनी तेथे बोलावून घेतले. मी तेव्हा कटक येथे वकीली करीत होतो. हाती घेतलेल्या केसचे कोर्टात आर्ग्युमेंट चालू होते. जज्जसाहेब तर त्यांच्या कडक स्वभावाविषयी प्रसिद्ध होते. परंतु मी जेव्हा त्यांना आर्ग्युमेंटसाठी पुढील तारीख देण्याविषयी विनंती केली, तेव्हा त्यांनी स्मितवदनाने परवानगी दिली. (हे विशेष) आम्ही कारने निघालो. राजमुंद्रीस रात्री मुक्काम केला आणि राहिलेला प्रवास दुसऱ्या दिवशी पूर्ण करण्याचे ठरविले. गोदावरील पूल वहातुकीसाठी खुला नव्हता, तरी महाराजांच्या कृपेने कच्च्या पुलांवरून आम्ही नदी पार केली.

त्यादिवशी ग्रहणकाल संपल्यावर संध्याकाळी आम्ही महाराजांच्या समवेत कृष्णा नदीवर गेलो. नदीच्या पात्रात आम्ही ओल्यात्याने उभे होतो. महाराजांनी आम्हांस दिक्षा दिली आणि तेव्हापासून परमाचार्य आमचे गुरू झाले !

१९७४ साली कांची पीठाधिपती श्री जयेंद्रसरस्वती स्वामीजी उत्तर भारताच्या विजय यात्रेसाठी निघाले. आणि आपल्या गुरूंनी १९३६ साली केलेल्या विजय यात्रेची जणू त्यांनी आम्हांस आठवण करून दिली.

समाजातील विविध स्तरातील लोकांचे कल्याणासाठी जवळ जवळ एक महिना ओरिसा प्रांतामध्ये आम्ही श्री जयेंद्र स्वामीजींच्या भेटीच्या कार्यक्रमांचे आयोजन केले. मंदिरे आणि शिक्षण संस्थांनापण भेटी दिल्या. स्वामीजी कटक येथे पोहोचेपर्यंत बऱ्याच ठिकाणी विद्यार्थ्यांना एकत्र आणून स्वामीजींच्या बरोबर चर्चासत्रे आयोजित केली. कटक आणि भुवनेश्वर येथे मोठ्या प्रमाणात सभांचे आयोजन करण्यात आले. आणि शेवटी पुरी (जगन्नाथपुरी) येथे सर्वधर्म परिषदेचे उद्घाटन श्री जयेंद्रसरस्वती स्वामीजींनी केले. सात दिवस चाललेली ही परिषद अतिशय यशस्वी झाली. त्यामुळे मठातील बहुतेक सर्वांना आम्ही परिचित झालो. जेव्हा जेव्हा आम्हांस कांची मठामध्ये महाराजांचे दर्शनास जाण्याचा योग आला त्यावेळी त्यांनी आम्हांस एखाद्या सन्मित्राप्रमाणे वागणूक मिळे. परमाचार्यांना ओरिसामधील आपल्या शिष्याच्या (जयेंद्र सरस्वती स्वामीजीच्या) प्रत्येक कार्यक्रमाविषयी माहिती असे.

१९७८ साली परमाचार्यांनी कांचीपूरम सोडले आणि जवळजवळ सहा वर्षे कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्र राज्यामध्ये त्यांनी पायी विजय यात्रा केली. ज्या ज्या ठिकाणी महाराजांनी मुक्काम केला त्या सर्व ठिकाणी आम्ही दर्शनासाठी गेलो. हगेरी (कर्नाटक) हंपी, सातारा, पंढरपूर, गुलबर्गा, महागांव, मेहबूब नगर, कर्नूल आणि रायचोटी या मुक्कामांच्या ठिकाणांचा उल्लेख करता येईल.

## पुर्णाहूती दिनी पर्जन्यवृष्टी

फेब्रुवारी १९८२ मध्ये महाराजांच्या आदेशाप्रमाणे महारूद्र होम हवनाचे कटक येथे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमासाठी महाराजांच्या आज्ञेचे कांची मठाचे व वाराणसी मठाचे उत्तम सहकार्य आणि पूर्ण पाठिंबा मिळाला. यज्ञ व्यवस्थित पार पडला तर पूर्णाहुतीच्या दिवशी पर्जन्यवृष्टी होईल असे जगद्गुरूंनीआम्हांस सांगितले होते. यज्ञाचे आयोजन केल्यानंतर पुर्णाहुतीचा कार्यक्रम पूर्ण होण्यास फक्त पंधरा मिनिटेच बाकी होती. आकाश तर निरभ्र असून सूर्यनारायण तळपत होता. परंतु एवढ्यात आकाशात काळे ढग (पावसाचे) जमा झाले, त्यांनी सूर्यबिंब झांकले आणि यज्ञाच्या ठिकाणी पर्जन्यवृष्टी झाली.

जुलै/ऑगस्ट १९८२ मध्ये ओरिसाच्या गव्हर्नरपदावर माझी नेमणूक झाली होती. चातुर्मासाचे दिवस होते. परमाचार्यांचा मुक्काम त्यावेळी गुलबर्गाजवळ महागांव येथेहोता. आम्ही महाराजांच्या दर्शनास जाण्याची तयारी केली. राजभवनातील बऱ्याच जणांची आमच्याबरोबर येण्याची इच्छाहोती. खूप प्रयत्न केल्यानंतर आमचा २१ जणांचा ग्रुप तयार झाला.

मार्च १९८३ मध्ये माझी नेमणूक सुप्रिम कोर्टात झाली. दिल्लीहून कांचीपूरम येथे जाणे अवघड नसले तरी थोडे गैरसोयीचे होणार अशी थोी भीती माझ्या मनात होती. परंतु हा माझा समज लौकरच खोटा ठरला. कांचीपूरम येथील माझ्या भेटीचे योग लवकर लवकर आले. या अवधीत कांचीपूरम येथे सहा वेळा जाण्याचा मला योग आला.

१९५८ ते ८२ या चौतीस वर्षांच्या कालावधीत आमच्या कुटुंबातील प्रत्येकास महाराजांच्याद र्शनाचा योग आला व त्यांचे कृपाशिर्वाद लाभले आहेत.

महाराजांच्या दर्शनासाठी मी एकदा गेलो असतां मनांत विचार आला की परमाचार्यांचे आमच्यावर विशेष प्रेम आहे. दुसऱ्या एका प्रसंगी केरळमधून कांही भक्त महाराजांच्या दर्शनासाठी आले होते, त्यांच्याबरोबर बोलतांना मी या गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला असता, त्या लोकांनी सांगितले महाराजांची त्यांच्यावरपण तितकीच कृपादृष्टी आहे. सूर्यनारायणाप्रमाणे, आपल्याजवळ असलेले सर्वस्व महाराज तुम्हांस देतात. तुम्ही कितपत ग्रहण करू शकता यावर तुमची प्रगतीअवलंबून आहे !

वयाच्या १३व्या वर्षी महाराजांनी मठामध्ये प्रवेश केला आणि सज्ञान झाल्यानंतर त्यांनी मठाची व्यवस्थापण हाती घेतली. त्यामुळे त्यांचा बाहेरच्या जगाशी संबंध आला. गेली ८० वर्षे अव्याहतपणे त्यानां र्स लोक भूदेवच मानत आहेत. कित्येकांना त्यांच्याठिकाणी ईश्वराची प्रचिती येते. केवळ देवच नव्हे तर जगन्माता श्रीकामाक्षी देवीचेही त्यांच्याठिकाणी वास्तव्य आहे अशी भाविकांची दृढ श्रद्धा आहे ! कांचीपूरम् येथील प्रख्यात पुरातन श्री कामाक्षी मंदिराचे कांची पीठाधिपती विश्वस्तपण आहेत. महाराजांचे वास्तव्य जरी कांचीपूरम येथेअसले तरी त्यांच्या दृष्टीपुढे भारताचे दृश्य सदैव नाचत असते.

एकदा मंत्रालयातील कायदा आणि न्याय खात्यातील एक सदस्य माझ्याबरोबर कांचीपूरम् येथे आले होते. महाराजांना नमस्कार केल्यानंतर महाराजांनी त्यांना बरेचसे प्रश्न विचारले. सदर गृहस्थ मूळचे डेरा ईस्माइलखान (हे ठिकाण सध्या पाकिस्तानमध्ये आहे.) येथील रहाणारे होते. या भागाची महाराजांना एवढी सविस्तर माहिती होती की, त्यांचे भेदक प्रश्नांना उत्तर देणे सदर गृहस्थांना अशक्य वाटू लागले. अखेर त्यांनी कबूल केले की, सदर ठिकाण त्यांनी तरुणपणीच सोडून स्थलांतर केले असल्यामुळे (भारत पाकिस्तान विभागणीच्या वेळी) महाराजांच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे ते देऊ शकणार नाहीत.

## स्वामींचे त्रिकालज्ञान

दुसऱ्या एका प्रसंगी मेक्सिकन दूतावासातील एका परिचित अधिकाऱ्याची व माझी मद्रास येथे भेट झाली. महाराजांचे दर्शनासाठी येण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. तेही आमच्याबरोबर कांचीपूरम् येथे आले. महाराजांना नमस्कार केल्यानंतर ज्या गोष्टी केवळ त्यांनाच माहिती आहेत अशी त्यांची कल्पना होती, त्या सर्वांची महाराजांना इत्थंभूत माहिती आहेहे समजल्यानंतर तर त्यांस कमालीचे आश्चर्य वाटले. सदर मेक्सिकन दूताचे फार्म हाऊसचे यथार्थ वर्णन महाराजांनी केले. त्या फार्म-हाऊस जवळून एक नदी वहाते असे महाराजांनी सांगितले. एवढेच नव्हे तर त्यांच्या कुटुंबियांचीही तंतोतंत माहिती त्यांनी दिली.

आणखी एका प्रसंगी आम्ही महाराजांच्या दर्शनासाठी कांचीपूरम् येथे गेलो असता, त्याच वेळी स्पेनचा राजा आणि राणी महाराजांच्या दर्शनास आली होती. महाराजांनी त्यांना विचारलेल्या प्रश्नांमुळे तर ते खूपच आश्चर्यचकित झाले आणि जेव्हां त्यांना सांगण्यात आले की महाराज भारताबाहेर केव्हाही गेले नाहीत, तेव्हा तर त्यांचा विश्वासच बसेना !

महाराजांना माहित नही अशी एकही गोष्ट नसावी. पण ते लक्षात येण्यासाठी फक्त मनाची थोडी एकाग्रता हवी.

महाराजांनी मद्रास येथे केलेल्या प्रवचनांचे माझ्या बंधूंनी उडियामध्ये भाषांतर केले आणि त्याची पहिली प्रत महाराजांना अर्पण केली. वाचतां वाचतां, एका पानावर त्यांची दृष्टी स्थिर झाली. आम्हांस वाटले की, छपाईमध्ये काही दोष असावा. इतक्यांत त्यांनी सदर पुस्तकाची मूळ इंग्रजी प्रत मागवून घेतली. (ती प्रतही लगेच उपलब्ध झाली.) उडिया भाषेतील पुस्तकाचे पान मूळ इंग्रजी पुस्तकातील पानांशी पडताळून पहाण्यास माझ्या बंधूंना महाराजांनी सांगितले. आणि काय आश्चर्य ! आम्हाला असे आढळून आले की, महाराजांचे मुळ इंग्रजीमध्ये उल्लेख केलेल्या भाषणातील भागाचा बरोबर उलट अर्थ भाषांतरीत पुस्तकात करण्यात आला होता.

## स्वामींचे अचाट अंतर्ज्ञान

महाराज जरी देहरूपाने कांचीपूरम् येथे आहेत पण त्यांच्या मनाची भरारी उत्तुंग अशा परमेश्वरापर्यंत आणि आजूबाजूच्या मानवाची सेवा करण्यासाठी ती सदैव सिद्ध असते. विविध गोष्टींबद्दल महाराजांना रुची आहे.एके वेळी त्यांना वर्तमानपत्रे वाचून दाखविली जात. पण पुढे अंतर्ज्ञानाने त्यांना सर्व गोष्टी अवगत झाल्या. दर्शनार्थी आलेल्या लोकांशी त्यांची चर्चा ऐकणे केवळ मनोरंजकच नव्हे तर अर्थपूर्ण असल्यमुळे आपल्या ज्ञानात भरच पडते. प्रत्येक विषयाबद्दल त्यांना संपूर्ण माहिती असते. आणि जेव्हा क्षणातच ते त्या विषयावर बोलत तेव्हा तर भेटावयास आलेली व्यक्ती तर स्तंभितच होऊन जात असे.

महाराजांचे ठायी परम सहिष्णुता नेहमीच आढळून येते. महाराजांचा मुक्काम जेथे असे, त्या ठिकाणी एक फ्रेंच डॉक्टर नेहमी दर्शनास येई. प्रथमत: महाराज बाहेर येऊन दर्शन देत ! हळूहळू डॉक्टरांमध्ये आंतरिक परिवर्तन होऊ लागले. आणि कांही वर्षांनी त्यांचा चेहरा तेजस्वी दिसू लागला. त्यांचे पूर्ण परिवर्तन झाले आणि त्यांस परमानंद प्राप्त झाला. आता आमच्यामध्ये मिसळून आमच्याबरोबर महाराजांच्या दर्शनाचा ते लाभ घेतात. (सदर डॉक्टरने रामायणाचे फ्रेंचमध्ये भाषांतर केले आहे. ते भारतीयांशी एवढे तद्रूप झाले आहेत की त्यांचे मूळ नांव ड्रॅमॅटियन असताना आपणास **देवव्रत** म्हणून संबोधावे अशी ते विनंती करतात.)

याचप्रमाणे एक फ्रेंच शिक्षिका पॅरिसहून महाराजांच्या दर्शनासाठी येई आणि ती आपला सर्व मोकळा वेळ कांचीपूरम् येथे घालवू लागली. कांही वषर्शनी तिच्यात एवढा अमूलाग्र बदल झाला ती भारतीय म्हणूनच येथे राहू लागली. एवढेच नव्हे तर आपली वेषभूषाही ती भारतीयाप्रमाणेच करू लागली.

**परमाचार्यांना सर्व धर्म समान आहेत. बायबलचे संदर्भात किंवा कुराण किंवा गुरू ग्रंथसाहेब यांच्या संदर्भामध्ये जेव्हां ते बोलतात, तेव्हा त्यांच्या बोलण्यात आणि चेहऱ्यावर आदराची भावनाच स्पष्ट दिसते ! प्रत्येक मनुष्य, मग तो कोणत्याही धर्माचा असो, परमेश्वराचा अंश आहे, असे ते ठामपणे मांडतात. अन्य सर्व धर्मगुरूंप्रमाणे प्रत्येकास ते समान मानतात. आणि सर्वांना समान वागणूक हीच त्यांच्या मठातील संस्कृती आहे, परंपरा आहे.**

दोन वर्षांपूर्वीपासून महाराजांची तब्येत बरी नव्हती. आमच्यापैकी काही जणांना फार काळजी वाटू लागली. परंतु महाराजांच्या चेहऱ्यावर त्रास होत असल्याची काहीही चिन्हे आढळली नाहीत, किंवा त्यांच्या वागण्यावरूनही तसे कधी जाणवले नाही.

या दोन वर्षांच्या कालावधीत मठामध्ये जाण्याचा मला योग आला. मी एकट्यानेच जेव्हा दर्शन घेऊन नमस्कार केला, तेव्हां महाराजांनी मला विचारले की, तुझ्या मनांत काय आहे ? (यावेळी खरोखरच माझ्या मनात विचार घोळत होता. खरे तर नमस्कार करताना मनाची एकाग्रता पाहिजे होती.) मी या प्रश्नाने आश्चर्यचकित झालो.

''मानवाच्या कल्याणासाठी आणि कृपादृष्टी लाभण्यासाठी महाराजांना दीर्घायुष्य लाभावे'' असेच माझे मनोगत मी व्यक्त केले !

निरागस स्मित करून महाराज उद्‌गारले, ''जो जन्मास आला आहे, त्यास एक दिवस तरी जायलाच हवे. ''**जातस्य हि ध्रुवोऽमृत्यु:**''

# आचार्यांची दिव्यदृष्टी

**– एस. गुरुमूर्ती**
माजी सहसंपादक इंडियन एक्सप्रेस

— ❖ ❖ ❖ —


*श्री. एस. गुरुमूर्ती, मद्रास, माजी सह संपादक, 'इंडियन एक्सप्रेस', यांच्या कांची कामकोटी शंकराचार्य श्री. चंद्रशेखरेंद्र सरस्वती स्वामी महाराज यांच्या जन्मशताब्दिनिमित्त प्रसिद्ध झालेल्या स्मरणिकेतील मूळ इंग्रजी लेख 'टू अनफरगेटेबल एनकाऊन्टर्स' - 'Two Unforgettable Encounters.' लेखाचा मराठीतील स्वैर अनुवाद.*

— ❖ ❖ ❖ —

''सी. बी. आय. (गुप्तचर विभाग) अधिकाऱ्यांनी तुझ्या घरावर छापा घालावा असा तू काय गुन्हा केला होतास ?''

महाराजांनी स्मित वदनाने विचारले. अशा मोहक स्मित हास्यांनी पॉल ब्रंटन (विख्यात ब्रिटीश तत्त्ववेत्ता) आणि रॉबर्ट कोसलर सारख्या महान विद्वानांना बराच वेळ मुग्ध केले होते.

१९८७ च्या जानेवारीतील पहिल्या आठवड्यातील ही घटना आहे. नंतर सुमारे १५ दिवसांनी सरकारी दप्तरातील 'गोपनीय' फायलीमधील माहितीचा उपयोग औद्योगिक क्षेत्रात घडणारी मोठी फसवणूक/लबाडी या संदर्भातील गुन्हा उजेडात आणण्यासाठी केल्याबद्दल गुप्तचर विभागातील अधिकाऱ्यांनी माझ्या घरावर छापा घालून मला अटक केली.



महाराजांनी विचारलेल्या प्रश्नांमुळे माझी तर गाळणच उडाली. विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर मला माहित होते परंतु उत्तर देण्याचे धैर्य मला होईना ! अखेर कसेबसे अवसान आणून आणि मनाचा हिय्या करून मी उत्तरलो, ''देशात घडणारा फसवणुकीचा मोठा गुन्हा उजेडात आणण्यासाठी सरकारचे गोपनीय फायलीमधील माहितीचा मी उपयोग केला आणि म्हणून - ऑफिशियल सिक्रेट ॲक्टचा भंग केल्याच्या आरोपावरुन गुप्तचर विभागाने माझ्या घरावर छापा घातला होता.

महाराजांचा पुढचा प्रश्न तर धक्कादायकच होता !

''पंतप्रधान भ्रष्टाचारी आहेत असे तू लिहिलेस काय ?'' महाराजांनी विचारले.

मी चाचपडत उत्तर दिले - ''नाही प्रत्यक्षपणे नाही.''

पण अप्रत्यक्षपणे तरी ? महाराजांनी पुन्हा प्रश्न केला.

''होय'' मी म्हणालो. ''सर्व सरकारच भ्रष्ट आहे असा आरोप मी लेखात केला.'' या नंतर महाराजांनी विचारलेला प्रश्न अगदीच अतर्क्य होता. What would you do if they latter charge you with sedition and espionage against the country?''

सरकारने जर तुझ्यावर हेरगिरी व देशद्रोहाचा आरोप ठेवला तर तू काय करशील ?

मी खरे तर चमकलोच ! परंतु स्वतःस सावरत मी म्हणालो, ''नाही, मुळीच नाही, माझ्यावर सरकार असा आरोप ठेवणे शक्य नाही.''

उत्तराची अशी टाळाटाळ महाराजांनी मान्य नव्हती. महाराजांना माझ्याकडून स्पष्ट उत्तर हवे होते, म्हणून त्यांनी पुन्हा विचारले, 'सरकारने तुझ्यावर हेरगिरीचा आरोप ठेवला तर तू काय करशील ?'

माझ्याजवळ उत्तर नसल्यामुळे माझे मन सैरावैरा धावू लागले.

अशी काही घटना घडू शकेल काय ? मी मनाशी विचारले. असा आरोप ठेवता येणे अशक्य नाही हे महाराजांना समजले होते काय ? केवढी ही दूरदृष्टी ! एका दृष्टीक्षेपात अनंताचा वेध घेणारी (खरे तर

महाराज सिध्दपुरूष असल्याने भविष्यात घडणाऱ्या घटना त्यांना समजत होत्या. परंतु त्यांनी असे कधी आम्हांस भासविले नाही. ) मी विनम्रपणे गप्प बसलो.

तू काय करशील ? तुझ्या येणाऱ्या मानसिक दडपणामुळे तू मोडून पडणार नाहीस ना ? महाराजांनी विचारले. 'छे! मुळीच नाही.' मी तात्काळ उत्तर दिले. तरीसुध्दा महाराजांचा पुढील प्रश्न होताच -

तुझा शारिरिक व मानसिक छळ करण्यात आला, तर नाईलाजाने शरण जाऊन तू माफी मागशील काय ?

काही झाले तरी मी शरणागती मुळीच पत्करणार नाही. मी ठामपणे उत्तर दिले.

माझ्याकडे व माझ्या पत्नीकडे महाराजांनी क्षणभर कृपादृष्टीने पाहिले. त्या एका कृपाकटाक्षाचा आनंद वर्णनापलिकडचा होता.

तू जे काही केलेस ते सर्व मला मान्य आहे. महाराजांनी आशिर्वाद दिला व मला कामावर रुजू होण्यास सांगितले.

एकाद्या गरीब वैदिक ब्राम्हणास छोटेसे घरकुल बांधण्यासाठी उपयोग व्हावा या हेतूने मी काही रक्कम महाराजांना अर्पण केली व महाराजांनी त्याचा स्वीकारपण केला. भक्ताकडून भक्तीभावाने अर्पण केलेल्या फुला फळाखेरीज महाराज कधीच अन्य कशाचा स्वीकार करीत नसत ! परंतु एका गरीब गरजू वैदिक ब्राम्हणाच्या घरबांधणीसाठी मी अर्पण केलेली रक्कम महाराजांनी स्वीकारली हे पाहून मला धन्यता वाटली आणि त्या पवित्र वातावरणातून अश्रूपूर्ण नयनांनी आम्ही बाहेर पडलो.

सुमारे २ महिन्यांनी म्हणजे १३ मार्च १९८७ रोजी सकाळी ६ वाजेपूर्वीच आमचा वृत्तपत्र विक्रेता व पाठोपाठ सी.बी.आय.च्या अधिकाऱ्यांनी आमच्या घरात प्रवेश केला.

राष्ट्राध्यक्षांनी पंतप्रधानांना लिहिलेले पत्र वृत्तपत्रात प्रसिध्द झाले होते. त्या दिवशीचे सकाळीच वृत्तपत्रात ते प्रसिध्द होणार होते ! परंतु त्याची प्रतिक्रिया म्हणून अपेक्षा केलेल्या वेळेपूर्वीच सी.बी.आय.ने कारवाई केली होती. माझ्या घराची चार तासपर्यंत संपूर्ण झडती घेण्यात आली.

दुपारीच खिन्न मनाने कांचीपुरमला दाखल झालो. सी.बी.आय.ने असे वारंवार माझ्या घरावर छापे घातले तर त्यामुळे माझ्या कुटुंबियांना अतोनात त्रास सोसावा लागेल, या कल्पनेने मी पार खचून गेलो होतो.

त्या दिवशी ज्या वेळी मी घरी जाण्यासाठी महाराजांनी परवानगी मागितली त्यावेळी 'थांब' अशी त्यांनी हातानी खूण केली. अखेर रात्रीचे दहा वाजले. मला मद्रासला परतणे भाग असल्याने पुन्हा मी महाराजांची अनुज्ञा मागितली. त्यांनी ती नाखुषीने दिली. मी मद्रासला घरी पोहोचलो त्या वेळेस रामनाथ गोएंकाच्या घरावर सी.बी.आय.ने धाड घालून त्यांना अटक केली असून मला ताबडतोब दिल्लीस बोलावण्याबद्दलचा दिल्लीहून फोन आला होता.

ती वेळ साधारणपणे रात्री १२॥ ची असावी. क्षणातच माझे मित्र के. माधवन् यांच्या नेतृत्वाखाली सी.बी.आय.च्या ऑफिसर्सनी माझ्या घरी येऊन मला अटक केली. त्या अधिकाऱ्यांनी त्या रात्री, दुसऱ्या दिवशी व दुसऱ्या दिवशी रात्रभर चौकशीसाठी माझ्यावर प्रश्नांचा भडीमार केला. दुसऱ्या दिवशी म्हणजे १५ तारखेस मला दिल्लीस नेण्यात आले. मद्रास येथील विमानतळावर विमान प्रवासासाठी जात असतांना श्री. माधवन यांनी त्या दिवशीचा इंडियन एक्स्प्रेसचा अंक देऊन मला उपकृत केले.

"C.B.I. charges Gurumurthy with espionage and sedition."

'गुरुमुर्ती यांचेवर हेरगिरी व देशद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला आहे.'

ही बातमी वाचल्यावर माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना ! क्षणातच मी डोळे उघडले आणि भूतकालातील जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातील कांचीपूरम येथे घडलेल्या घटना माझ्या डोळ्यापुढून सरकू लागल्या. महाराजांपुढे त्यावेळी मी हात जोडून उभा होतो.

जर तुझ्यावर हेरगिरी व देशद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला, तर तू काय करशील ? तुझा शारिरीक व मानसिक छळ करण्यात आला तर नाईलाजाने शरण जाऊन तू माफी मागशील काय ?' महाराजांचे हे शब्द माझ्या कानांत घुमत होते.

राज्यकर्त्यांच्या निघृण शक्तीपासून एक महान शक्ती माझे रक्षण करीत आहे अशी जाणीव मला झाली व माझ्यामध्ये असा जबरदस्त आत्मविश्वास निर्माण झाला की काही माझ्या नसानसातून पोलादाचा कणखरपणा निर्माण होत आहे व माझे स्नायू जणू लोहमय बनले आहेत !

कोणी बरे मला एवढे कणखर बनवले ? खरोखर गुरुमहाराजांनीच माझी पूर्वतयारी करुन घेतली आणि माझे रक्षण केले हेच खरे !

एका आठवड्याचे आत सत्य बाहेर आले. खोट्या कागदपत्राच्या आधारावर माझ्यावर आरोप करण्यात आला होता तो सिध्द होऊ शकला नाही. कोर्टाने माझी जामिनावर मुक्तता केली. जामिनावर सुटल्याबरोबर लगेच मी पहिली कोणती गोष्ट केली असेल तर ती म्हणजे कांचीपुरम येथे जाऊन महाराजांचे दर्शन घेतले.

महाराज उद्गारले, 'निक्सन (अमेरिकेचे अध्यक्ष) यांनी हेरगिरी केली, रेगन असत्य बोलले, व सरकारने खोटे कागदपत्र तयार केले.'

महाराजांचे हे उद्गार म्हणजे निकाल माझ्यासारखा होऊन मी निर्दोष मुक्त होणार याचे सुचक होते.

वरील हकीकतीवरुन जबरदस्त शत्रूपासून सत्याचे संरक्षण करण्यासाठी दैवी शक्तीच अवतरते हे सिध्द होत नाही काय ?

# महायोगी देवराहा बाबा

- सुरेशचंद्र वारघडे



— ❖ ❖ ❖ —

*"बच्चा! योग्याला त्याचे वय विचारले जात नसते तर त्याचे ज्ञान, भक्ती आणि वैराग्य विचारले जाते. बच्चा! वय ही शरीराची अवस्था आहे आत्म्याची नव्हे. या सर्व अवस्तांपासून योगी मुक्त असतो. तो एक फक्त एक नित्य शुद्ध आत्माच असतो" महायोगी संत देवराहा बाबांचे हे उद्‌गार त्यांचा अधिकार व त्यांच्या साधूत्वाचे दर्शन आहे. अशा देवराहा बाबांबद्दल सांगताहेत निसर्गमित्र सुरेशचंद्र वारघडे.*

— ❖ ❖ ❖ —

अनादीकाळापासून भारत ही साधूसंतांची पवित्र भूमी आहे. या भूमीने विश्वकल्याणार्थ अनेक महायोग्यांना जन्म दिला आहे. आजही हिमालयाच्या गिरीकंदरात आणि पवित्र तीर्थस्थानी महायोग्यांचं वास्तव्य आहे. गु म्हणजे अंधार आणि रू म्हणजे प्रकाश. समाजाला अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेण्याचे कार्य विविध संप्रदाय आणि पंथाचे योगमहर्षि गुरू करीत आहेत. भारतीय अध्यात्माची अधिष्ठान असलेली विश्वबंधुत्वाची प्राचीन परंपरा जतन करीत आहेत. प्रयागराज (अलाहाबाद), उज्जैन, नाशिकच्या कुंभमेळ्यात आणि हिमालयातल्या दऱ्याखोऱ्यात भटकताना विविध योगपुरुषांच्या दर्शनाचे भाग्य मला लाभले. गंगा यमुना आणि सरस्वतीच्या पवित्र त्रिवेणी संगमावरील महाकुंभमेळ्यात एक हिमयोगी भेटले. ते मला अधिक भावले. ब्रह्मलीन देवराहा बाबा हे त्यांचे नाव. गंगेच्या विशाल वाळवंटातील एकांत ठिकाणी बांबूवर ठोकलेल्या मचानावर ते राहात होते. त्यांच्या मचानाभोवती असंख्य भाविकांची गर्दी झाली होती. कमरेला मृगजीन गुंडाळलेले देवराहा बाबा सर्वांना हात वर करून आशीर्वाद देत होते. त्यांच्या दर्शनार्थ जमलेल्या भाविकात उत्तर प्रदेशचे मंत्री आणि बडेबडे अधिकारी होते. अधूनमधून ते भाविकांशी संभाषण करीत होते.

**कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने।**
**प्रणतक्लेश नाशाय गोविंदाय नमो: नम: ॥**

हा आवडता मंत्र म्हणायला सांगत होते.

साधारण उंची, जटा वाटलेल्या, पिकलेली दाढी, शरीर बळकट परंतु कमरेत वाकलेले तांबूस गव्हाळ वर्णाचे बाबा तेज:पुंज दिसत होते. त्यांच्या मचानाखालची दर्शनार्थींची पहिली गर्दी गेल्यावर आम्ही दुसऱ्या गटाबरोबर मचानाजवळ गेलो. बाबांचा आशीर्वाद मिळविण्यासाठी दर्शनार्थींची उत्सुकता वाढली होती. बाबा उठून मचानावरील झोपडीत गेले. पुन्हा बाहेर आले. त्यावेळी रेटारेटी झाली. बाबांनी सर्वांना शांत राहण्यास सांगितले. सारेजण मान उंचावून त्या महायोग्याकडे एकटक पहात होते.त यावेळी मचानाचे बांबूला लटकलेले काही झेंडूचे हार खाली पडले. ते गोळा करण्यासाठी दर्शनार्थींची झुंबड उडाली परंतु ध्यानीमनी नसताना एक हार नेमका माझ्या गळ्यात पडला. मी धन्य पावलो.

बाबांच्या वयाबद्दल आणि जन्माबद्दल रहस्यमय चर्चा मी

ऐकली. कुणी त्यांचे वय तीनशे वर्षे असल्याचे सांगत होते. बाबांना त्याबाबत विचारता ते म्हणाले, **''बघा ! योग्याला त्याचे वय विचारले जात नसते तर त्याचे ज्ञान, भक्ती आणि वैराग्य विचारले जाते. बघा ! अवस्था शरीराची होते आत्म्याची नाही. सर्व अवस्था आणि चिंतेतून योगी मुक्त असतो. स्त्री, संतान, धनदौलत यापासून दूर असलेला मी एक आत्मनिष्ठ स्थितप्रज्ञ, नित्य शुद्ध आत्मा आहे. योगी ब्रह्मलीन अवस्थेत योगी वयाच्या बंधनातून मुक्त होतो.''**

जे लोक मांसाहार करतात त्यांनी तो सोडावा शाकाहारी बनावे. याबद्दल त्यांना उपदेश करताना बाबा म्हणाले, **''घरके मुडदे बाहर जलाते है. बाहरके मुडदे घर में लाके खाते है. अहंकाराचा त्याग केल्याशिवाय ईश्वराची ओळख होत नाही.''** अहंकारी माणसाबद्दल बोलताना ते म्हणाले, **''जो अकडते है वो मुडदे होते है. जो झुकते है उसमे जान होती है. सूर्य, चंद्र, प्रकाश, वायु, वृक्ष, जल हे प्रत्येक जीवाचे जीवनाभूत आधार आहेत. सृष्टीतील जीवांबाबत कोणताही भेदभाव न बाळगता ते सर्वांना समानतेने वागवतात. सर्वांच्या कल्याणाची कामना करतात. सर्वांना सर्वकाही देतात. मनुष्यप्राण्याने तस परोपकारी वागावे. जगातला प्रत्येक धर्म श्रेष्ठ आहे. प्रत्येक प्राणीमात्रात ईश्वराचा अंश आहे. आहार, निद्रा, भय, मैथून या भावना माणूस आणि पशूत सारख्याच आहेत. परंतु धर्म-संस्काराने मनुष्यप्राण्याला पशुपासून अलग केले आहे. माणसाने प्रत्येक धर्म आणि धर्मियांचा आदर केला पाहिजे. मानवता हाच प्रत्येक धर्माचा पाया आहे.''** हा विचार बाबांनी सर्वांसमोर सांगितला, स्वत: बाबा सर्व धर्माचा आदर करीत. उच्चनीचता, जात-पात ते मानीत नव्हते, सर्वधर्मीय त्यांचे भक्त होते. सर्व धर्माचा त्यांनी अभ्यास केला होता. चारही वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे, उपनिषदे, स्मृती, पातंजलीयोग यांचे सखोल अध्ययन त्यांनी केले होते. वेद हेच धर्माचे मूळ आहे असे बाबांचे मत आहे. रत्नांने भरलेल्या समुद्रात एकवेळ बुडी मारून रत्न मिळत नाही. पुन्हा बुडया मारल्यावरच रत्नलाभ होतो. त्याप्रमाणे अल्पकाल भजनपूजनाने भगवानप्राप्ती झाली नाही तर निराश बनू नका. दिर्घकाळ आराधना केली की ईश्वरकृपा निश्चित होते. हा विचार बाबा प्रत्येक सांगत होते.

## ॥ शरयू नदीतून प्रकटलेले बाबा ॥

योगमहर्षि देवराहा बाबांचा जन्म कुठे झाला ? ते कसे प्रगट झाले ? याबद्दल गूढ आहे. त्यांच्या परमशिष्यांनी काही घटना आम्हास कथन केल्या. कुणी बाबांचा जन्म बिहार राज्यातील सारण जिल्ह्यात झाल्याचे सांगत होते. कुणी उत्तर प्रदेशातील बस्ती जिल्ह्यातील उमरिया गावात झाल्याचे सांगतात. ते सात वर्षाचे असतानाच त्यांना आकाशगमनाची सिद्धी प्राप्त झाली होती. लहानपणीच ते घरातून बाहेर पडले. हिमालयातील घनदाट जंगलात त्यांनी घोर तपस्या केली. वन्यश्वापदे त्यांच्याजवळ येऊन बसत. पातंजलयोग साधनेतून ते अष्टांगयोगी बनले.

१९२७ साली गोरखपूर जिल्ह्यात भयानक दुष्काळ पडला. लोकांची उपासमार व्हायला लागली. नद्या वाहात होत्या पण त्यांचं पाणी शेतीसाठी वापरण्याच्या सुविधा नव्हत्या. शेती पावसावरच अवलंबून होती. मइल या गावचे ग्रामस्थ शरयूनदीकाठी जमले. पावसासाठी त्यांनी इंद्रदेवाची प्रार्थना सुरू केली. शरयूमातेची जलपूजा केली. त्यावेळी शरयूचे प्रवाहात एक माणूस वाहात असलेला त्यांना दिसला. लोकांनी आवाज केला. तो आवाज ऐकून तो माणूस किनारी आला. पाण्यातून बाहेर आला. त्याची तेजस्वीता पाहून लोक मंत्रमुग्ध झाले. सर्वांनी त्या दिव्यात्म्यासमोर साष्टांग दंडवत घातले. नदीच्या प्रवाहातून एक दिव्य विभूती प्रगट झाल्याची बातमी साऱ्या मईल गावात पसरली. बायकापोरं, वृद्धांसह सारे गाव शरयूकाठी लोटले. नदीच्या प्रवाहातून प्रगटलेला बाबा म्हणून सर्वांनी जलेश्वर बाबांचा जयजयकार केला. ग्रामस्थांनी दुष्काळाचे दु:ख बाबांच्या कानावर घातले. **''तुम्ही आता घरी जा. ईश्वरकृपेने पाऊस पडेल.''** असे वचन दिले. लोक घरी परतले. दोनतीन तासातच आकाशात कृष्णमेघांची गर्दी झाली. वीज कडकडू लागली. मुसळधार पावसाच्या धारा भूमीवर कोसळू लागल्या. ही आम्ही ऐकलेली देवराहा बाबांच्या प्रगटीकरणाची कथा आहे.


बाबांनी दुष्काळ हटवला. हा लोकांना चमत्कार वाटला. बाबा त्यांना महापुरूष वाटू लागले. पुन्हा बाबांना भेटण्यासाठी ते शरयूकाठी जमले. पण बाबा तिथे नव्हते. नदीपार करून पार पलिकडे गेले होते. शरयूच्या वाळवंटात चालताना दिसताच मच्छीमारांच्या नौकेतून पलिकडचा किनारा गाठला. बाबांचे पाय पकडून मईल गावात चलण्याची विनंती त्यांनी बाबांना केली. पण बाबांनी त्यास नकार दिला. मी कोणत्याही गावात राहात नाही. अन्न ग्रहण करीत नाही. वस्त्र मलालागत नाही. बाबांनी असे सांगताच लोक दु:खी झाले. त्यांचे दु:ख जाणून बाबा त्यांना म्हणाले, **''निराश होऊ नका. तुम्ही शरयूकाठी माझ्यासाठी एक मचान बनवा. या मचानावर मी राहीन.''** त्या काळात शरयूनदीच्या डोहात सुसरी होत्या. त्याबाबत लोकांना चिंता वाटत होती. लोकांची चिंता जाणून बाबा म्हणाले, **''यात काळजी करण्यासारखे काही नाही मगर-सुसरींची मला भिती वाटत नाही. त्यांना घाबरण्याचे कारण नाही. जे घडायचे असते त्याप्रमाणे जे होणार नाही ते कधीच होत नाही.'** बाबांच्या उपदेशाने ग्रामस्थांचा धीर वाढला. त्यांनी शरयूकाठी बांबूचे एक भक्कम मचान बांधले. त्यावर गवताची सुंदर झोपडी उभारली. तेव्हापासून बाबा मचानावरच राहू लागले.

हळूहळू बाबांच्या योगसिद्धीची बातमी सगळीकडे पसरली. मचानावर राहणाऱ्या बाबांच्या दर्शनासाठी लोकांची गर्दी जमायला लागली. एकदा मईल ग्रामस्तांना बाबा मचानावर दिसले

नाहीत. तीन-चार तास झाले तरी बाबांचा पत्ता नव्हता. लोकांना वाटले बाबांना सुसरीने खाल्ले. ते शोकाकूल झाले. त्याचवेळी बाबा शरयूच्या मध्यप्रवाहातून प्रगट झाले. आपली चिंता करू नका. माझ्या तपसाधनेत व्यत्यय आणू नका. असा सल्ला त्यांनी गावकऱ्यांना दिला.

**|| जलेश्वर बाबांचे नामकरण ||**

बाबा प्रगट झाले त्यावेळी ते अनाम होते. **'मचानावर राहणारा जलेश्वर बाबा'** म्हणूनच लोक यांना ओळखायचे. शरयूनदीला **देवरा** किंवा **देवरहा** असे दुसरे एक नाव आहे. त्यावरून शरयूचे काठी मचानावर राहाणाऱ्या बाबांचे नामकरण लोकांनी **देवराहा बाबा** केले. **देवरहा** या शब्दाचा अर्थ **देवाचे मंदिर असाही होतो.** हळूहळू सिद्धयोगी देवराहा बाबांचे योगीत्वाचा सुगंध सर्वत्र दरवळायला लागला.लांबलांबून लाके त्यांच्या दर्शनासाठी यायचे. आपले दु:ख त्यांना सांगायचे. बाबा त्यांना मार्गदर्शन करून चिंतामुक्त करायचे. भजनकिर्तन करायला लावायचे. बाबांचे मचान शरयूच्या पाणथळ जागेत होते. पावसाळ्यात महापूराच्या अगोदर मचान उंच केले जायचे. भजनकीर्तन चालू असताना सुसरी त्या ठिकाणी यायच्या. लोकांना त्यांची भिती वाटायची. तुमचे भजन ऐकायला सुसरी आल्या आहेत. घाबरू नका. जोरात नामस्मरण करा असे बाबा सांगायचे.



मईल गावापासून वीस किलोमीटर अंतरावर एक परमहंस योगी राहात होते. त्यांचे शिष्य शिक्षणमहर्षि बाबा राघवदास नावाचे स्वातंत्र्यसेनानी होते. देवराहा बाबांचे नाव ऐकून ते त्यांच्या दर्शनासाठी आले. नावेतून बाबांच्या मचानाकडे निघाले. त्यावेळी शरयूला पूर आला होतो. मचानापासून त्यांची नाव दूर होती. देवराहा बाबांनी नाव पाहिली. पुढे न येता माघारी जाण्यासाठी बाबांनी नावाड्याला इशारा केला. हातवारे करून ते मोठ्याने ओरडायला लागले, ''परत फिरा, परत फिरा'' सांगू लागले. राघवदास व नावाड्याला त्यांचा संकेत समजला नाही. नाव मचानाकडे यायला लागली. बाबांना भयंकर राग आला. त्यांनी मचानावरील झोपडीचे बांबू काढून नावेच्या दिशेने फेकायला सुरूवात केली. मोठ्याने ओरडून निर्भत्सना करू लागले. बाबांचे हे विपरित वागणे पाहून राघवदासांना नवल वाटले. त्यांना राग आला. हा देवराहा बाबा क्रोधापासून मुक्त नाही. खरा सिद्धयोगी नाही. त्याचे दर्शन घ्यायला नको. त्याने आपला अपमान केला. म्हणून रागावलेल्या राघवदासांनी नावाड्याला सांगून नाव परत फिरवली. नाव सुखरूप किनाऱ्यावर पोहचली त्यावेळी अचानक शरयूचे पाणी वाढले. राघवदासांनी मचानाकडे दृष्टीक्षेप टाकला त्यावेळी प्रवाहाच्या वेगाने मचान तुटून बाबा पाण्यात पडले. प्रवाहात वाहात चाललेले यांना दिसले. त्यावेळी बाबांनी आपल्याला परत जायला का सांगितले त्याचे ज्ञान त्यांना झाले. बाबांच्या रौद्ररूपातही करूणा आणि दया असल्याचा साक्षात्कार त्यांना झाला. बाबांना आपण विनाकारण दूषण दिले याची त्यांना खंत वाटली.

मईलचे गावकरी बाबांच्या दर्शनासाठी आले असता त्यांना मचान महापुरात वाहून गेलेले दिसले. ग्रामस्थात खळबळ माजली. महापुराने सगळीकडे हाहा:कार माजविला होता. लोक उपाशी होते. पण स्वत:च्या दु:खापेक्षा बाबा वाहून गेल्याचे दु:ख त्यांना अधिक वेदनादायी वाटत होते. सारेजण शोकमग्न झाले होते. बाबा जलप्रवाहात वाहत वाहत परियान, नाजपूर, डुमाईगड, माझी, सितानदियारा, लोहारौला यामार्गे शरयूबरोबर छपरा या ठिकाणी पोहचले. नदीचे काठाकाठाने चालत ते गौतम आश्रम, गोदना, सेमरिया, माझी, गयासपूर, सिसवनमार्गे मईल ग्रामक्षेत्रात प्रवेशले. ग्रामस्थांनी त्यांना पाहाताच धावत ते त्यांच्याजवळ पोहचले. बाबांना सुखरूप पाहाताच सर्वांना आनंद झाला. मग त्यांनी महापूराने केलेल्या नुकसानीबद्दल बाबांना सांगितले. बाबांनी त्यांना प्रश्न केला, **''शरयूमाता तुमची जमीन सोडून मागे हटली तर ती जमीन तुम्ही गोमातेला चरण्यासाठी सोडणार का ?''** सर्वांनी होकारार्थी उत्तर दिले. देवराहा बाबांनी शरयूची प्रार्थना केली. शरयूचा कोप चार-पाच दिवसात शांत झाला. तिने आपला मार्गही बदलला. पूर्वीच्या ठिकाणी पुन्हा ग्रामस्थांनी मचान बांधले. बाबा त्यावर निश्चिंत मनाने राहू लागले. योगसाधना करू लागले. समाजाला मार्गदर्शन करू लागले. ही श्री देवराहा बाबांची जीवनकहाणी आम्हाला ऐकायला मिळाली.

## बाबांचे त्रिकालज्ञानी

सामान्य माणसाबरोबरच अनेक थोर पुरूषही महायोगी देवराहा बाबांचे भक्त होते. त्यात महात्मा गांधी, पुरुषोत्तमदास टंडन, मोतीलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, ब्रिटीश गव्हर्नर, डॉ. राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाईपटेल, झाकीर हुसेन, मदन मोहन मालवीय, विनोबा भावे, जयप्रकाश नारायण, पंडित नेहरू, लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, गुलजारीलाल नंदा, शंकरदयाळ शर्मा, कमलापती त्रिपाठी, जगजीवनराम यांचा समावेश आहे. राजीव गांधींपासून विश्वनाथ प्रतापसिंह - चंद्रशेखर या सर्वांनी देवराहा बाबांचे-दर्शन व आशीर्वाद घेतले होते. त्यात अनेक राज्य, केंद्रिय मंत्रीगण, अधिकारी, न्यायाधिश यांचा समावेश आहे. १९३१ साली अलाहाबादच्या कुंभमेळ्यात मदन मोहन मालवीय व मोतीलाल नेहरू यांनी श्री देवराहा बाबांचे दर्शन घेतले. त्यावेळी पंडित नेहरू त्यांच्याबरोबर होते. त्यांच्याकडे पाहात, **''हा बच्चा विश्वविख्यात शांतीदूत नेता बनेल.''** अशी भविष्यवाणी त्यांनी वर्तविली होती. १९५४ साली प्रयागराजच्या कुंभमेळ्यात राष्ट्रपती कै. राजेंद्र प्रसाद यांनी बाबांचे चरण गंगाजलाने धुवून ते चरणामृत प्राशन केले होते. राष्ट्रपती झाकीर हुसेन यांच्याशी बाबांनी फारसी भाषेतून संभाषण केले. अंर्तज्ञानाने बाबांना सर्व भाषा येत होत्या. विदेशी पाहुण्यांशी ते त्यांच्या भाषेतून बोलत. त्यांच्या प्रदेशाचे वर्णन अचूक सांगत. यावरून बाबा **त्रिकालज्ञानी** होते. प्रत्यक्ष प्रवास न करताही दिव्यचक्षूने सारे जग पाहात. टेलीपॅथीद्वारे ते आपल्या शिष्यांना संदेश देत. भूतभविष्य सारे त्यांना कळत असे.

बाबा सतत मचाणावरच राहात. भल्यापहाटेच गंगास्नानासाठी खाली उतरत. मचानावरूनच ते जनतेला दर्शन व आशीर्वाद देत. मोठमोठ्या नेतेगणांसाठी ते मचानावरून आपला पाय खाली सोडत. नेते व मंत्रीगण त्यांची पावलं आपल्या डोक्यावर घेत. भूतपूर्व राज्यपाल चन्नारेड्डी यांनी बाबांचा पाय डोक्यावर घेतलेला फोटो काढून तो राजभवनात लावला. त्यावेळी वृत्तपत्रात बरीच टिका झाली. बाबा मंत्रीगणांना लाथ मारतात असे छापले गेले. सामान्य जनांना मात्र ते असा आशीर्वाद देत नव्हते. त्याबाबत विचारता बाबा म्हणाले, **''नेत्यांच्या हातात देशाचे व जनतेचे भवितव्य असतं. अशा विवेक गमावलेल्या नेत्यांना जागृत करण्यासाठी व जनतेच्या कल्याणाची प्रेरणा देण्यासाठी आपण त्यांना पायाच्या अंगठ्याने आशीर्वाद देत असतो.''** बाबा मचानावरच का राहातात ? हा प्रश्न अनेकजण विचारीत. बाबांनी अष्टंगयोग धारण केलेला आहे. अष्टांगयोग धारण केलेला योगी आकाश आणि जमिनीवर राहू शकत नाही. म्हणून बाबा मचानावर राहात असल्याचे उत्तर त्यांचे परमशिष्य देवदास बाबांनी दिले.

## योगशक्तीने चमत्कार

१९८९ सालच्या कुंभमेळ्यात ब्रह्मर्षि देवराहा बाबांच्या दुर्लभ दर्शनाने आमचे तनमन आनंदमय झाले. बाबांच्या उपदेशातून अनेक गुढरहस्याचा उलगडा आम्हास झाला. जी घटना बुद्धीग्राह्य वाटत नाही ती घटना समाजात चमत्कार म्हणून ओळखली जाते. विज्ञानाने ब्रह्मांडातील अनेक रहस्यांचा शोध घेतला आहे. त्या घटनाही सामान्य माणसाला चमत्कार वाटतात. विज्ञानातील रहस्याच्या कार्यकारण भावाचे विशेषज्ञान वैज्ञानिकांना असते. परंतु या विश्वात अशा अनेक घटना घडतात की त्या विज्ञानाबाहेरच्याआहेत. कर्मयोगातून माणूस ब्रह्मांडाचे ज्ञान मिळवू शकतो. तसेच अध्यात्म व योगाद्वारे विश्वचालक शक्तीशी त्याचे नाते जुळते. जे विज्ञानाला शक्य नाही. योगशक्ती ही एक महान शक्ती आहे. त्यामुळे चित्तवृत्ती निरोध होतो. चित्तवृत्तीवर विजय मिळवता येतो. त्यासाठी अविरत योगसाधना जरूर असते. या साधनेद्वारे सिद्धावस्था प्राप्त होते. अशा सिद्धयोग्याकडून काही घटना करतात. त्यांचे आकलन मानवास होत नाही. म्हणून त्याला ते चमत्कार वाटतात. विज्ञानातील चमत्कारासाठी बाह्य साधनांची गरज लागते. परंतु सिद्धयोग्यांना त्याची जरूरी नसते. सिद्धयोगी चमत्काराचे प्रदर्शन मांडत नाही. नमस्कारासाठी त्यांचे चमत्कार नसतात, गळणाऱ्या वृक्षाच्या पानासारखे सिद्धयोग्याकडून सहज चमत्कार घडतात. त्याचे भान सिद्धयोग्याला नसते. समाजाचे अज्ञान दूर करून त्याचे कल्याण सिद्धयोग्याच्या चमत्कारात असते.

आज समाजाला नादी लावणाऱ्या जादूटोणा करणाऱ्या जादूगार ढोंगी साधूबुवांचा सुळसुळाट वाढला आहे. अंगारेधुपारे करणारे, देव अंगात येणारे व्यसनी, मांसमच्छी खाणारे, महिमामहिना स्नान न करणारे अस्वच्छ ढोंगी साधू हे खरे साधू नाहीत. ते नीतीभ्रष्ट साधू संमोहनशक्तीचे प्रयोग करण्यात पटाईत असतात. त्यांचा ते दुरुपयोग करताल, समाजाला नाडतात, ईश्वरकृपेसाठी देवाला कोंबडे-बकरे कापायला लावतात. नारळ, पैसे, फळे-फुले, मिठाईवाहायला सांगतात. तुमच्याकडून काही घेून त्या मोबदल्यात कृपाशिर्वाद देणारा देव हा नफेखोर व्यापारी नाही. मुक्या प्राण्यांचे बळी दिल्याने ईश्वराची कृपा होण्याऐवजी अवकृपा होते. प्रत्येक जीवात ईश्वर आहे. माणसाप्रमाणेच तो मुक्या प्राण्यातही आहे. देवाचे नावावर बकरे कापून त्याचे मांस खाणे महापातक आहे. दिनदुबळ्यां प्राणीमात्रांची सेवा करणारा ईश्वरास प्रिय होतो. आपल्या हृदयातील ईश्वराची ओळख पटली की तीर्थस्थानी जाण्याची व देवाला काहीही वाहण्याची गरज नाही. जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आईनस्टाईन यासही अंतिम समयी ईश्वरशक्तीची ओळख पटली होती. या देवराहा बाबांच्या विचाराने आम्ही भारावून गेलो.

देवराहा बाबांचे मार्गदर्शनासाठी मईल गावी येण्यास गोरगरीब सामान्य माणसास खूपच क्लेश सोसावे लागत. हे जाणून १९८५ साली बाबा वृंदावनला आले. यमुनाकिनारी मचान बांधून त्यावर

राहू लागले. दर बारा वर्षांने भरणाऱ्या प्रयागराजच्या महाकुंभमेळ्यास ते नित्यनियमाने भाविकांच्यासाठी जात. १९८९ सालच्या महाकुंभमेळ्यात त्यांची अमृतवाणी आम्ही ऐकली.

१९९० साली बाबा ब्रह्मलीन झाले. या जगाचा निरोप त्यांनी घेतला. ११ जूनला बाबानी समाधी लावली. त्यांचा खणखणीत आवाज हळुहळु क्षीण होत गेला. त्यापूर्वी 'मी समाधिवस्थेत आहे. माझी अवस्था पाहून घाबरू नका. डॉक्टरला बोलवू नका' असे आपल्या शिष्यास त्यांनी सांगून ठेवले होते. त्यांचे शिष्य देवदास बाबा सातत्याने त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी जागृतीची वाट पहात जवळच उभे राहिले. आठवड्याने १९ जूनला दुपारी एक वाजता बाबांची चेतना जागली. फुलणाऱ्या कळीसारखे त्यांचे डोळष उघडले. परंतु देवदास बाबा काही बोलण्याअगोदरच दिर्घ श्वास घेत त्यांनी डोळे झाकले. हळुहळु सिद्धासनातले बाबांचे शरीर ढिले पडायला लागले. सारे शणीर अचेतन दिसायला लागले. धाडस करून देवदास बाबांनी त्यांच्या शरीरास हात लावला, त्यावेळी शरीर गरम लागले. नाडी मंदगतीने चालत होती. दुपारी साडेतीन वाजल्यापासून बाबांचे डोके पुढे झुकायला लागले. त्यावेळी नाडीपरिक्षण करता बाबांच्या नाडीचे ठोके पुर्णपणे बंद झाले होते. देवदास बाबा रडायला लागले. त्यांनी आपल्याल गुरूबंधुंना सांगितले. सगळे चिंताग्रस्त झाले. श्री देवराहा बाबांनी शरीराचा त्याग केल्याची बातमी सगळीकडे पसरली. राज्य सरकार दरबारीही बातमी पोहचली. पोलिस अधिकारी धावत आले. बाबा पूर्णपणे सिद्धासनात होते. फक्त त्यांचे डोके खाली झुकले होते. त्यामुळे चेहरा दिसत नव्हता. बाबांनी पूर्णरूपात शरीर त्यागले आहे हे मानायला देवदास बाबा तयार नव्हते. कारण त्यांचे शरीर अद्याप गरम होते. समाधीवस्थेत बाबा मंदगतीने शरीराचा त्याग करीत आहे. असे देवदासबाबा सांगत होते. रात्री दहा वाजता बाबांचे बगलेत थर्मामीटर ठेवून त्यांचे तापमान तपासले त्यावेळी १०७ डिग्री भरले. अर्ध्या तासाने ते १०६ झाले. बाबांनी देह सोडण्याच्या बातमीमुळे वृंदावनात अंतिम दर्शनासाठी गर्दी जमायला लागली. डोके पु झुकल्याने व्यवस्थित फोटो घेता येईन. रात्री पावणेअकरा वाजता देवदास बाबांनी त्याचंया डोक्याला स्पर्श केला त्याक्षणी बाबांची टाळू फुटण्याचा आवाज आला. त्यांच्या टाळूतून रक्ताचे फवारे उडाले. देवदास बाबांचे हातही रक्ताने भरले. श्री देवराहा बाबांनी शिलीशिखेतून प्राणत्याग केला होता. देवदासांनी रक्त पुसून त्यांच्या टाळूत कापूस भरला. बाबांच्या डोक्याला कापड बांधले. सिद्धयोगी ध्यानावस्थेत सिद्धसाधना करून कपाळाचे आज्ञाचक्राद्वारे देह सोडतो. त्यावेळी टाळूवरील मांस फाटते, बाहेर पडणाऱ्या रक्ताच्या फवाऱ्याबरोबर साधकाचा आत्मा शरीरत्याग करतो. जन्ममृत्युच्या चक्रव्युहातून मुक्त होतो.

**अलौकिक हिमयोगी**

श्री देवराहा बाबांनी हिमालयातील गिरीकंदरात पातांजलयोग साधना केली. उड्डयान बद्ध मुद्रा व गुडाकेश अवस्था धारण केली होती. या अवस्थेत जीभ गळ्यात उलटी होते. सिद्धयोगी भोजन व पाणी न घेता केवळ प्राणवायूवर जगतो. त्याच्या जीभेचा अग्रभाग प्राणवायूबरोबर चंद्रकमल जीवनशक्तीचे रसपान करतो. योगी निद्रेवरही विजय मिळवतो. महाभारतात भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला गुडाकेश अवस्था प्राप्त करण्यासंबंधी उपदेश केल्याचा उल्लेख आहे. अशीअवस्ता धारण करूनच देवराहा बाबा १९२५ साली मईल गावाजवळ शरयू नदीच्या प्रवाहातून प्रगट झाले. म्हणून अलौकिक योगशक्तीचे स्वामी असलेल्या बाबांना मा आनंदमयींनी **'हिमयोगी'** म्हटले आहे. बाबांचे शिष्य श्री रामदास बाबा ही सारी माहिती सांगत होते.

रामदास बाबा अधिक माहिती सांगताना म्हणाले ''सात हजार दिवस तपस्या साधना करणारा योगी उड्डयन बंध मुद्रा धारण करू शकतो. ही मुद्रा धारण केल्यावर त्याचा एक दिवस सात पटीने वाढतो. तो सत्तर हजार दिवसापर्यंत शरीर धारणा करून २६० वर्षांपर्यंत सहज जिवंत राहू शकतो. श्री देवराहा बाबा या प्रकारातले अष्टांग योगी होते. त्रिकालज्ञानी होते. स्थितप्रज्ञ, आत्मनिष्ठ, जात-पात न मानणारे गंगाभागीरथीसारखे पावनतीर्थ होते. त्यांनी स्वतःसाठी ईश्वराजवळ काही मागितले नाही. काही कमावले नाही. हयातभर त्यांनी विश्वकल्याणाची कामना केली. त्याग, संयम, साधना व तपस्येचे ते प्रतीक होते. अध्यात्मप्रधान भारतीय संस्कृतीचे प्रतिक होते. योगीराज राजेश्वर होते. मनुष्यदेहाची सार्थकता, उपासनेत मनाचा योग, पातंजल योग दर्शन, वैदिक वाङ्मय उत्पत्ती व विशालता, वेदपुराणांचा महिमा, श्री सूर्यनारायणाची उपासना, दुर्लभ मानव शरीर, मोक्षाचा हेतु, आचार विचाराचे धर्मशास्त्रातले दर्शन, सेवेचे महत्व, पंचमवेद, पुनर्जन्माचा कर्मयोगी सिद्धांत, वासनेचा समूळ नाश, अन्नाचे महत्व, जंगम तीर्थराज, भारतीय संस्कृतीचे मुळ तत्व, योगसाधना, सिधसंतांच्या चमत्काराचे महत्व, गायत्री मंत्र जपविधी, रामनाम व ध्यान महत्व, साकार व निराकार उपासना, दया आणि धर्म, हटयोग, दिव्यप्रेम, नादबिंदू रहस्य, धर्माचार, सदाचार व ग्रहस्थधर्म, भूदान महत्व, देवमयी गोमाता, निष्काम भक्तीयोग, योगासन व मानवी जीवन, ग्रहस्थ व योगसाधना इत्यादी अनेक विषयांवर श्री देवराहा बाबांनी विवेचन करून समाजाला मार्गदर्शन केले आहे.''

हिमयोगी श्री देवराहा बाबांनी आपल्या इच्छेनुसार देहत्याग केला. २० जूनला त्यांचा देह दर्शनासाठी त्यांच्या प्रिय मचानावर ठेवण्यात आला. दिल्ली, कलकत्ता, हरियाना, उत्तर प्रदेश, पंजाब, राजस्थान, मुंबई, हिमाचल प्रदेशातील हजारो भाविकांनी श्री देवराहा बाबांचे अंतिम दर्शन घेतले. त्याकाळचे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री मुलायमसिंग व केंद्रिय मंत्र्यांनीही बाबांचे अंत्यदर्शन घेतले. २१ जून १९९० रोजी ब्रह्मलीन देवराहा बाबांच्या देहास यमुनेत विधिवत जलसमाधी देण्यात आली. विश्वसंत परंपरेची व वैराग्याची अखंड ज्योत पंचतत्वात विलीन झाली.

# ॥ ज्ञानदेव : विवेकानंद ॥
# दोन महामानवांचे विवेकमंडण

- डॉ. हे. वि. इनामदार
अध्यक्ष, गीताधर्ममंडळ, पुणे.

— ❖ ❖ ❖ —

*'ज्या तोलाचा संत, त्या तोलाचा साक्षात्कार' या न्यायाने, 'ज्या तोलाचा लेखक, त्या तोलाचा त्याचा साहित्यसंभार', असे सार्थपणे सांगता येईल. मागच्या पिढीतील बाळशास्त्री हरदास, सोनोपंत दांडेकर, धुंडामहाराज देगलूरकर, गुरुदेव रानडे, शं. दा. पेंडसे प्रभृती परमार्थपर लेखन करणारे साहित्यिक एका उंच पातळीवरून साहित्यसेवा करीत होते. अलीकडच्या पिढीत श्री. रं. कुलकर्णी, व दि. कुलकर्णी, (कै.) स. गं. मालशे, ग. वा. तगारे, ह. श्री. शेणोलीकर अशा काही मातब्बर लेखकांनी तत्त्वचिंतनपर/अध्यायत्मपर स्वरूपाचे सकस लेखन केले आहे.त्यांच्या श्रेय-नामावलीत डॉ. वि. रा. करंदीकर या नाममुद्रेला बरेच वरचे स्थान द्यावे लागेल.*

— ❖ ❖ ❖ —

## मला आवडलेला ग्रंथ

'अथाऽतो ब्रह्मजिज्ञासा' या तत्त्वशोधकाच्या भूमिकेवरून करंदीकरांची आजवरची समग्र 'साहित्यसंपदा सिद्ध झाली आहे. सांस्कृतिक स्वरूपाचे कार्य करणाऱ्या संस्थांमध्ये रामकृष्ण मठ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संस्थांच्या कार्यामध्ये करंदीकरांनी स्वत:ला झोकून दिले आहे. रामकृष्ण संघाचे श्री रामकृष्ण आणि स्वामी विवेकानंद यांच्या कर्तृत्वाचा आलेख त्यांनी जसा समर्थपणे शब्दांकित केला आहे, तशीच त्या संघाची एका शतकाची वाटचालही त्यांनी सविस्तर, साधार व सूत्रबद्ध स्वरूपात ग्रंथनिविष्ट केली आहे. डॉ. हेडगेवार, गोळवलकर गुरूजी आणि स्वा. सावरकर या युगंधर पुरूषांनी हिंदुत्वाच्या संवर्धनासाठी बजावलेल्या कामगिरीचा वेधक परामर्श करंदीकरांनीआपल्या लेखनातून घेतला आहे.

ज्ञानेश्वर, वामनपंडित आणि लोकमान्य टिळक या तिघांनी घडविलेले विचारदर्शन करंदीकरांच्या संशोधनाचे परिपक्व फलित आहे. ज्ञानदेव, तुकाराम आणि रामदास या तीन संतकवींच्या विचारसंपदेचे सामर्थ्य आणि सौंदर्य त्यांनी उलगडून दाखवले आहे.

'सांस्कृतिक संचित' हे करंदीकरांच्या एका ग्रंथाचे जसे नाव आहे, तसेच ते त्यांच्या एकूणच साहित्य-निर्मितीचे मध्यवर्ती व समान सूत्र आहे. याच सूत्राला धरून त्यांनी 'ज्ञानदेव : विवेकानंद' हा आपला गअंथ सादर केला आहे.वास्तविक ज्ञानदेव आणि विवेकानंद यांच्यात काळाचे आणि पंथाचे बरेच अंतर आहे. ज्ञानदेव हे मध्ययुगीन संतमेळ्याचे प्रणेते होते, तर विवेकानंद हे रामकृष्ण संघाचे आधुनिक काळातील शिल्पकार आहेत. ज्ञानदेवांनी वयाच्या एकविसाव्या वर्षी संजीवन समाधी घेतली. विवेकानंदांना एक्केचाळीस वर्षांचे आयुष्य लाभले. **'वयसेचिया गावा न जातां। बालपणींच सर्वज्ञता। वरी जयातें।'** हे ज्ञानेश्वरांनी केलेले वर्णन या दोघांनाही सारखेच लागू





पडते. '**साधु दिसती वेगळाले । परि ते स्वरूपीं मिळाले ।**' किंवा, 'All great men think alike', ही वचने या दोघांच्याही बाबतीत सार्थ ठरतात.

विवेकानंद यांच्या नाममुद्रेत 'विवेक' आणि 'आनंद' अशी दोन पदे आहेत.ही दोन्ही पदे ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्त्वात प्रत्ययाला येतात. '**मज विवेकु सांगावा । मऱ्हाटा जी ।**' असे ज्ञानदेवांचा अर्जुन भगवंताला विनवितो (ज्ञानेश्वरी : ३-१७) ज्ञानदेवांच्या लेखीआनंद हा आत्मानंद आहे; परमानंद आहे. ज्ञानदेवांप्रमाणे विवेकानंदांच्या लेखी ज्ञान हाच देव आहे. त्यामुळेच ज्ञानदेव आणि विवेकानंद यांच्या तत्त्वचिंतनाला आणि कर्तृत्वाला प्राधान्य देणाऱ्या प्रस्तुत लेखसंग्रहाला करंदीकरांनी या दोन महामानवांच्या नाममुद्रांनी अलंकृत केले असावे.

प्रस्तुत संग्रहातील पंधरा लेखांपैकी शेवटचे पाच लेख स्वतंत्रपणे लिहिलेले आहेत. पहिल्या दहा लेखांची निर्मिती प्रसोपात्त झाली आहे. नियतकालिके व संपादित ग्रंथ यांच्यासाठक्ष लेखन, तसेच दोन ग्रंथांना दिलेल्या प्रस्तावना असे त्यांचे स्वरूप आहे. मात्र या सर्वच लेखांचा परस्परांशी कोणताही संबंध नाही. प्रत्येक लेख हा एक स्वतंत्र, स्वायत्त व स्वयंपूर्ण घटक आहे. या लेखांचे स्वरूप जरी प्रासंगिक असले, तरी त्यांची मांडणी सविस्तर आहे; आणि त्यांचे अंतरंग समृद्ध आहे. बाह्य कारण नैमित्तिक, पण आशय मात्र चिरंतनाचा वेध घेणारा, असा हा लेखनप्रपंच आहे. ज्ञानदेव, तुकाराम आणि विवेकानंद यांच्या जीवितकार्यातील काही प्रमुख अंगांवर प्रकाश टाकावा, हा लेखनहेतू येथे सिद्धीस गेला आहे.

करंदीकर म्हणतात, 'प्रज्ञा आणि प्रतिभा, तत्त्वचिंतन आणि सौंदर्यवृत्ती, प्रखर वैराग्य आणि व्यापक करूणा, अंतर्लीन आत्ममग्नता आणि प्रेमपूर्ण संवादशीलता अशा दुर्मिळ गुणांचा मनोज्ञ संगम ज्ञानदेव-विवेकानंदांच्या ठायी झालेला आढळतो. अनुभवावर आधारलेले अध्यात्म, मांगल्याची साद घालणारी समाजसन्मुखता, तत्त्वविचारांची केलेली अभिनव मांडणी, आध्यात्मिक मूल्यांचे मूर्तिमंत दर्शन घडविणारे जीवन आणि समाजाला आपत्काळात नवसंजीवन देणारे व्यक्तिमत्त्व हे या दोघांच्या ठिकाणी आढळणारे समान विशेष आहेत. प्रत्यक्षात त्यांचा कोणताही संबंध आलेला नसला, तरी भारताच्या आध्यात्मिक परंपरेतील ते दोन दैदीप्यमान तारे आहेत.'' - या सर्व वर्णनाचा प्रत्यय यावा, अशाच तोलामोलाचे लेख प्रस्तुत संग्रहात समाविष्ट झालेले आहेत.

ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्त्व जसे अलौकिक आहे, तसेच ज्ञानेश्वरीतील विचारदर्शनही अलौकिक आहे. 'ज्ञानदेवांतें वाट

पुसतु।' वारकरी पंथाचे महत्त्वमापन करावे लागेल. ''एकीकडे सामान्य पातळीवरील वारकऱ्यांचे चित्त हरण करणे आणि दुसरीकडे ज्ञानाच्या क्षेत्रातील प्रज्ञावंतांचे लक्ष वेधून घेणे, अशा दोन्ही अंगांनी ज्ञानेश्वरी अवघ्या समाजाला नित्य खुणावत राहिली आहे.... ज्ञानदेवांचे अलौकिक जीवन आकाशगामी होते. भूमीवरील मृत्तिकेचा स्पर्श त्याला नव्हता, पण आपणा सर्वांच्या जीवनाला ते प्रकाश देऊन गेले.''

ज्ञानदेवांची शब्दकळा, त्यांचे भावविश्व, कर्मविचार आणि चिद्विलासवाद या विषयांचा परिचय पूर्वार्धातील लेखांतून करून देण्यात आला आहे. ग्रंथाच्या उत्तरार्धातील लेख विवेकानंदांची भारतयात्रा, त्यांचे व्यक्तिमत्त्व, शिकागोची सर्वधर्मपरिषद, विवेकानंदांचे राष्ट्रचिंतन आणि क्रांतदर्शित्व अशा काही विषयांना वाहिलेले आहेत. विवेकानंदांच्या परिभ्रमणातून आणि व्याख्यानांतून पूर्व व पश्चिम यांचा जो समन्वय साधला गेला, त्याचे प्रत्ययकारी समालोचन शेवटच्या लेखात करण्यात आलेले आहे.

ग्रंथाच्या मध्यभागी असलेला लेख ज्ञानदेव आणि विवेकानंद यांच्या जीवनदृष्टीतील अनुबंध विशद करणारा आहे. या दोघांच्याही ठायी समान आध्यात्मिक धारणा होती. भारताच्या इतिहासात अतीव अवनतीचा काळ आलाअसताना या दोघांची जीवने घडलेली आहेत; आणि त्यांनी केलेल्या कार्यामुळे समाजाला नवजीवन प्राप्त झाले आहे. मध्ययुगातील मराठी संतांनी जे विचार मांडले, त्या सर्वांचे एकत्रित दर्शन विवेकानंदांमध्ये घडते. आध्यात्मिक विचारांच्या आधाराने समाजाचे जीवन विशुद्ध आणि उन्नत व्हावे, हा या दोघा महामानवांचा जीवनहेतू होता. हे करंदीकरांनी स्पष्ट केले आहे.

व्यक्तीच्या अंत:करणातील चलन-वलनाचा शोध घेताना करंदीकरांची लेखणी भावमुग्ध व तलस्पर्शी बनते. बाल मुक्ताईचे हे वर्णन पाहा : ''आईविना सैरभैर झालेली मुक्ता ज्ञानदेवांच्या डोळ्यांसमोर मोठी होत होती. ज्ञानदेवांनी दहाव्या वर्षापासून अठरावे वर्ष गाठेतो, मुक्ता सहाव्या वर्षापासून चौदाव्या वर्षापर्यंत पोहोचली. मुलीच्या दृष्टीने ही वर्षे किती महत्त्वाची असतात, हे सांगण्याची गरज नाही. कशी गेली असतील तिची ही वर्षे ? काय असतील तिचे अनुभव ? तिच्याहून मोठे असलेले तीन भाऊ घरात होते. आपले आकार घेत असलेले स्त्रीचे मन तिला कोणाजवळ मोकळे करणे शक्य झाले असेल ?''

करंदीकरांची लेखनशैली प्रासादिक असूनही ती अल्पाक्षर स्वरूपात एखाद्या विचाराचा थेट वेध घेते. ज्ञानदेवांनी संजीवन समाधी घेतली, तेव्हा काय घडले, हे सांगताना ते लिहितात, ''केवळ दहा-अकरा वर्षे आधी आईवडिलांविना अनाथ झालेले ज्ञानदेव आज अनेकांना सनाथ करून गेले आहेत; आणि हे जग सोडून जाण्याच्या त्यांच्या निर्णयामुळे सर्वांना आपण अनाथ होत असल्यासारखे वाटत आहे, हा अनुभव मुक्ताईला साक्षात् घेता आला. केवढा धन्यतेचा क्षण !''

ज्ञानदेव आणि मुक्ताई, ज्ञानदेव आणि तुकाराम, ज्ञानदेव आणि कालिदास, तसेच ज्ञानदेव आणि विवेकानंद यांच्यातील वैचारिक भावबंध करंदीकरांनी हळुवारपणे आणि मार्मिक स्वरूपात स्पष्ट केले आहेत. त्यांचे हे सारेच तौलनिक व्यक्तिदर्शन सर्वस्वी अभिनव आहे; आणि विचारप्रवर्तकही आहे.

पंधरा विचारपुष्पांची एक सुंदर लेखमाला करंदीकरांनी या संग्रहाच्या रूपाने गुंफली आहे.

'- ग्रंथु निका जाला असे !'

**ज्ञानदेव : विवेकानंद**
डॉ. वि. रा. करंदीकर
स्नेहल प्रकाशन, ४७०, शनिवार पेठ, पुणे.
पाने : २४०, किंमत रु. १७५/-

## विवेकानंद वाणी

**धी**र व्हा, साहसी व्हा. प्रथम माझ्या संतानांनी वीर बनले पाहिजे. कोणत्याही कारणाने सत्याशी थोडी देखील तडजोड करू नका. उच्चतम सत्याचा जगात सर्वत्र प्रचार करा. तुमचा मानसन्मान नष्ट होईल किंवा अप्रिय संघर्ष निर्माण होईल असे भय बाळगू नका. निश्चित जाणून असा की नाना प्रकारची प्रलोभने समोर असूनही जर तुम्ही सत्याला चिकटून राहाल तर तुमच्या ठायी अशी दैवी शक्ती उत्पन्न होईल की जिच्यासमोर, तुम्ही ज्या गोष्टी सत्य मानीत नाही त्यांच्यासंबंधी तुमच्याशी बोलण्यास लोकांना भय वाटेल. सतत चौदा वर्षे तुम्ही जर कठोरपणे सत्याचे अखंड पालन करू शकला तर तुम्ही जे काही म्हणाल त्यावर लोक पक्का विश्वास ठेवतील.

# संत सहवासाचे वाटाडे : संतकवि दासगणू

– डॉ. अनिल सहस्रबुद्धे
अहमदनगर.



— ❖ ❖ ❖ —

*श्री साईबाबांच्या प्रभावळीतील भक्त मंडळींमध्ये संतकवि दासगणू हे प्रमुख होते. दासगणूंच्या गुरूने यापुढे तू श्री साईबाबांनाच आपले गुरू मान असे सांगितले होते पुढे दासगणूंनी एकनिष्ठेने साईभक्तीचा आपल्या रसाळ कीर्तनांनी सर्वत्र प्रसार केला. दासगणूंचे साईबाबांपर साहित्य हाही एक अभ्यासाचा स्वतंत्र विषय आहे अशा दासगणू महाराजांच्या जीवनमंमेचे डॉ. सहस्त्रबुद्धे यांनी घडविलेले दर्शन -*

— ❖ ❖ ❖ —

**एम्.** ए.ची उत्तरपत्रिका लिहीत होतो. संगमनेर महाविद्यालयाचा 'साईबाबा हॉल', 'मुक्तेश्वर' या नेमलेल्या 'विशेष साहित्यिकाचा अभ्यास' या विषयाची प्रश्नपत्रिका. 'एम्..' (व्होल) चे संपूर्ण आठही पेपर्स एकाचवेळी देण्याचे धाडस करीत होतो. काय घडत होते कळेना. काही केल्या काही सूचेना ! आठवेनाच काही ! घाम फुटला ! झाले

आधीच धाडस करीत असल्याबद्दल डॉ. चुनेकरांनी नाराजी आणि प्रश्न प्रकट केलेला. एक पेपर जरी निराशाजनक ठरला तरी 'एम्.ए.'ला विशेष श्रेणी मिळायची नाही. प्राध्यापक होण्याच्या महत्त्वाकांक्षेने प्रेरित झालेले मन खट्टू झाले ! व्याकूळ झाले. डोळे मिटून काही वेळ अगदी स्वस्थ बसून राहिलो. डोळे उघडले आणि समोर अक्षरे दिली 'श्री साईबाबा दालन।' मनोमनी साईनाथमहाराजांना प्रार्थना केली. ''मला यश द्या, मला यश द्या, मला यश द्या !'' मनात स्मरण झाले श्रीसंत दासगणूंच्या वचनांचे -

**''संत हेच भूमीवर। चालते बोलते परमेश्वर ॥**
**वैराग्याचे सागर। दाते मोक्षपदाचे ॥१॥**

**संत हे सन्नीतीची। मूर्ति होय प्रत्यक्ष साची ॥**
**संत भव्य कल्याणाची। पेठ आहे विबुध हो ॥२॥**

**त्या संतचरित्रांस। श्रवण करा सावकाश ॥**
**आजवरी ना कवणास। संतांनी या दगा दिला ॥३॥**

**ईश्वरी तत्त्वांचे वाटाडे। संत हेचि रोकडे ॥**
**हे अमोघ ज्ञानाचे गाडे। भरले असती प्रत्यक्ष ॥४॥**

**संतचरणी ज्यांचा हेत। त्यांचा ऋणी रूक्मिणीकांत ॥**
**आता मलरहित करा चित्त। गजानन-चरित्र**
**ऐकावया ॥५॥**

'संत हेच भूमीवर। चालते बोलते परमेश्वर ॥', 'आजवरी ना कवणास संतांनी या दगा दिला ॥' या ओळी मनात घोळत असतांनाच मनोमनी साईनाथाला प्रार्थना घडत राहिली. लेखणी सुरू झाली. पेपर संपला. यथावकाश निकाल लागला. मला अपेक्षित श्रेणी मिळाली. त्या विशिष्ट प्रश्नपत्रिकेतही मी मिरवतो आहे. ही कथा आहे. १९७५ मधली. आता या गोष्टीला दोन दशके उलटून गेली असली तरी श्री संत दासगणूंच्या त्या चरणांनी माझ्या मनात संतश्रद्धेचे अधिष्ठान निर्माण केले आहे. आज कोणताही प्रसंग येवो मी श्री संत साईनाथांवर, श्री गजाननावर, श्री समर्थांवर भार टाकून मोकळा होतो. निवांत होतो. खात्री असते संकटमोचनाची, आनंदघन बरसण्याची. श्री संत दासगणूंनी माझ्यासारख्या कित्येक भक्तांना आपल्या संतचरित्र रचनांनी ऋणी करून ठेवले असावे.

योगायोगाने मी नगर शहरात राहावयास आलो. या नगरीत श्री दासगणूंचे वास्तव्य अनेक वर्षे होते. वास्तु होती. नगरकरांनी कृतज्ञतेने एका प्रमुख रस्त्याला दासगणूपथ असे नाव दिले आहे. योगायोगानेच या पथावरच विद्यामंदिर आणि न्यायमंदिर अगदी सुप्रतिष्ठित झाले आहे. श्री दासगणूंचे कार्य असे पुढे सुरू आहे !

ह.भ.प. संतकवी श्री दासगणूमहाराज पंढरपुरचे. त्यांचे आडनाव सहस्त्रबुद्धे. अगदी योगायोगाने आडनावबंधु होण्याचे भाग्य मला लाभले. एव्हढ्यावर भागले नाही. कुलस्वामीनी अंबाबाई, कोल्हापूर हे आमचेही कुलदैवत ! भाऊशास्त्री वझे यांनी म्हटले आहे, की, ''संत-चरित्रांनी व त्यांच्य अनुभवाच्या बोलांनी परमार्थाचे मार्गदर्शन जितकें लवकर व बिनचूक होते तितके शास्त्राध्ययनाने होत नाही.'' या त्यांच्या उक्तीचा प्रत्यय श्री दासगणूंच्या संत-चरित्र ग्रंथांतून अवघा महाराष्ट्र गेली अनेक वर्षे घेत आहे. श्री दासगणूलिखित ग्रंथाची पारायणे घराघरातून मोठ्या श्रद्धेने सातत्याने होत आहेत.

ह.भ.प. संतकवी श्री दासगणूमहाराज हे सिद्धहस्त कवी प्रतिभावंत. त्यातच भक्ती हा त्यांचा स्थायीभाव. पांडुरंगाच्या राऊळाचे सानिध्य. अखंड संत सहवास. यामुळेच श्री संतदासगणू यांनी आपल्या जीवनाचे ध्येय ठरविले संतचरित्रांचे लेखन ! संतांच्या सहवासाने जीवनाचा उद्धार होतो. प्रत्यक्ष परमेश्वराची मूर्तरूपे म्हणजे संत. त्यांचा सहवास जर सामान्यातीसामान्य माणसांना अनुभूतीपूर्वक घडला तर सामान्य माणसाला संसारात-प्रपंचात दिलासा, आधार, सुख, शांती, विश्रांती मिळेल. या भूमकेतून त्यांनी आपला सारा वेळ संतकथांमृताचे दानपान करण्यात घालविण्याचा निश्चय केला. प्रसंगी अखंडित लिहीत जावे. लेखणीच्या सहाय्याने प्रपंचभूमीची नांगरणी, सिंचन आणि पेरणी त्यांनी केली. संत दासगणूंवर संतकृपा झाली आणि अध्यात्मविद्येच्या माहेरघरी सामान्य माणसाला आश्रय मिळाला. प्रासादिक रसाळवाणीआणि संतकथामृत यांचे अभूतपूर्व संयुग निर्माण झाले आणि संतसहवासाचा सुकाळ झाला.श्री संत ज्ञाननाथांची प्रतिज्ञा श्री दासगणूंनीही पूर्ण करण्याचा यथाशक्ती यथामती प्रयत्न केला. 'आनंदाचे आवारु मांडू जगा !' संतचरित्ररूपाने त्यांनीअवघ्या भाविकजनांना आनंदाचे आवार घालून दिले.

संतचरित्र लेखनाची परंपरा नामदेवांपासूनची. नामदेवानंतर सर्व संतांची चरित्रे लिहिणारा मोठा चरित्रकार म्हणजे महिपती महाराज तहाराबादकर. योगायोगाने हे महिपतीबुवा नगर जिल्ह्यातलेच. महिपतींनंतर संतलेखनाचे सारे श्रेय केवळ

दासगणूंना जाते. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर 'नुसते सांगतो वाचा ग्रंथ । भक्तिविजय भक्तमाला ॥ त्या नंतर जे जे झाले । त्या त्या संता मी गाइले । ग्रंथ असती तीन केले । ते पहा म्हणजे कळेल कीं ॥ श्री दासगणू केवळ तीन ग्रंथ लिहून थांबले नाहीत. त्यांनी 'श्री गजाननविजय' हा अतिशय विस्तृत व रसाळ ग्रंथ त्यानंतर लिहिला. भूपाळ्या, काकडे, आरत्या, पदे अशी विविध प्रकारची पदरचना देखिल त्यांनी केली. नंतर ज्या ज्या महात्म्यांनी संतचरित्रे लिहिण्याचा प्रयत्न केला त्यांनी श्री दासगणूंचे ऋण मान्य केले आहे. श्री साईचरित्र रचयिते कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर उर्फ 'हेमाडपंत' यांनीही श्री दासगणूंच्या श्रीभक्तलीलामृत, श्री संतलीलामृत व श्री भक्तिलीलामृत यांचा आधार घेतला आहेच.

अस्थिर अशांत जीवनाचा प्रवास वादळात सापडलेल्या जहाजासारखा भरकटत जात असतांना, सुकाणूसारखे दिशा देणारे काही हवे असते. हे काम श्री संत दासगणूंनी मोठ्या तत्परतेने केले आहे. जीवनाला किनारा, बळ बहाल केले. सामान्य संसारी सुखदु:खात्मक अनुभवांच्या उदाहरणांतून त्यांनीआपले ग्रंथमंडन केले आहे. साक्षात्कारी, सिद्ध, पुण्यपुरुषांची सामान्यजनांतील भ्रमंती आणि सामान्यजीवनातील वास्तव्य यांचे मोठ्या चित्तवेधकतेने वर्णन त्यांनी केले. ओतप्रोतभक्ती, वेल्हाळ भाषा यामुळे तर त्यांचे ग्रंथ मनाचा ठाव घेतातच त्याचबरोबर मार्मिक तत्त्व प्रतिपादनामुळे ते ठसतात. संत आणि भक्त, साक्षातकारी आणि श्रद्धावंत, संत आणि याचक, सिद्ध आणि संसारी यांच्यातील संवाद अतिशय वेधकतेने मांडून प्रसंगातील नाट्य अधिक रोमहर्षक करतात. **'वाचे बरवे कवित्व । कवित्वी रसिकत्व । रसिकत्वी परातत्व । स्पर्शू जैसा॥'** ही ज्ञानेश्वरांनी मांडलेली साहित्याची व्याख्या श्री संतकवी दासगणू यांच्याबाबतीत तंतोतंत अनुभवास येते. भाषा साधी, व्यवहारातलीच. परंतु भक्तिभावनेतून पुनित होऊन प्रकटणारी असल्याने आणि तत्त्वविवेचनापेक्षा गोष्टीवेल्हाळपणामुळे प्रापंचिकाला, श्रद्धावंताला त्यांचे ग्रंथ प्रपंचात राहून परमार्थाची अनुभूती घडविण्यास उपयुक्त ठरतात. आधुनिक साहित्यात त्यांचे ग्रंथ मोडत नहीत परंतु मध्ययुगीन मराठी सारस्वताचा आध्यात्मिक साहित्यसौरभाचा वारसा बरोबर पुढे घेऊन येणारे दिसलात. त्यांच्या ग्रंथांना त्यातही 'श्री गजाननविजया'सारख्या ग्रंथाला पवित्र, पूजनीय, गुरूवत ग्रंथाचा दर्जा प्राप्त झाला आहे. वारकरी संप्रदायातील निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम आणि समस्त वारकरी यांच्या पंढरीच्या वाटेवर, साक्षात्कारी संत आणि पंढरीचा पांडूरंग यांच्या संबंधांची चर्चा आपल्या ग्रंथांतून, अनुभूतीकथनातून करून संत आणि देवत्वातील अभेद त्यांनी साक्षात्कारपूर्वक सिद्ध केला. हेच त्यांच्या ग्रंथाचे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. म्हणूनच श्री दासगणू सामान्य माणसाला बोटाला धरून संतसहवासात घेऊन जातात आणि अवघ्या प्रापंचिक जीवनाचे भरणपोषण करतात. परमेश्वराचा साक्षात्कार अशा विभूतीमत्त्वातून घडवितात. सामान्यातील सामान्य माणसाच्या जीवनाला संतांच्या आशिर्वादाचा भरभक्कम आधार देतात. जगण्याचे संघर्षाचे आघात सोसण्याचे बळ देतात ! परमार्थातील गूढता नाहीशी करून प्रत्येकाला संतांचा पढीयंता करतात. साधुसंतांना प्रपंचातील माता, पिता, गुरू, बंधु, सगा, सोयरा, मित्र परिवार रुपात पाहण्यास शिकवितात. म्हणूनच घराघरांत दासगणूंच्या पोथ्यांची पारायणे चालतात. आनंदनिर्भरतेने प्रसादपूर्वक अनन्य झाले की साऱ्या चिंता वारल्या जातात. मनाच्या मनात भावार्ततेने विश्वास, श्रद्धा प्रकट होत राहते -

**साई समर्था गजानना तू**
**पाठीशी असता -**
**भय कसे संसारी लढता ॥धृ॥**

**माय माऊली आमुची तू रे**
**'त्रिगुणात्मक' तू करुणाघन रे**
**तुझ्या कृपेचे कवच लेऊनी**
**सामोरे जाता - ॥१॥**

**संसारी या दु:ख अनावार**
**भोग भोगिती हे नारीनर**
**तव दृष्टीचे अमृत प्राशुनी**
**विसंबूनी असता - ॥२॥**

**अपराधी आम्ही चुकताचि जालो**
**वासनेत या गुंतूनी जातो**
**तव क्षमा गंगाजल प्राशुनी**
**तव पदी नित रमता ॥३॥**

# विसाव्या शतकातील महामानव
# विनोबा भावे



– म. श्री. दीक्षित, पुणे.

— ❖ ❖ ❖ —

*म. गांधीचा पहिला आवडता सत्याग्रही म्हणून विनोबा भावेंना ओळखत होतो व त्यांचे 'मधुकर' पुस्तक वाचले अभ्यासले तेव्हा हा सच्चा देशभक्त चांगला लेखक नि विचारवंत असल्याचं प्रत्ययास आलं. ज्येष्ठ समिक्षक म.श्री. दिक्षित यांनी गायलेली विनोबांची थोरवी !*

— ❖ ❖ ❖ —

१९४३-४४ साली मी नागपूरला हिस्लॉप कॉलेजात शिकत असतांना विनोबा भावे यांचं 'मधुकर' नावाचं पुस्तक आमच्या अभ्यासक्रमात होतं. तिथपर्यंत विनोबांची मी फक्त गांधीजींचा पहिला आवडता सत्याग्रही एवढीच कीर्ति ऐकलेली होती. पण 'मधुकर' हे त्यांचं चाळीस-पंचेचाळीस छोटयामोठया लेखांचं पुस्तक जेंव्हा अभ्यासलं तेंव्हा हा सच्चा देशभक्त चांगला लेखक नि विचारवंत असल्याचं प्रत्ययास आलं, आणि त्यांच्यांविषयी मनात आदरभाव निर्माण झाला. सुबोध भाषाशैली, सूत्रमय विचार, चिंतनशीलता आणि संस्कार करण्याची क्षमता असणाऱ्या या पुस्तकाने मी भारावून गेलो. शैलीपेक्षा आशयाने समृध्द असणाऱ्या या पुस्तकाच्या १०-१२ तरी आवृत्या निघाल्या असून लाखावर त्याचा खप झालेला आहे. ऋषीतर्पण, तीन गृहदेवता, मजुरांची जरुर, कवीचे गुण, गीताजयंती, संतांचा भागवतधर्म, महाराष्ट्राची सरस्वती, जीवन आणि शिक्षण, दासनवमी, कै. राजवाडे इ. विनोबांचे लेख खरोखरी विचारोन्मुख करणारे, नव्हे कृतीप्रवण करणारे आहेत.

## गीताई : मराठीतील चमत्कार

विनोबांच्या नावावर पंचवीस-तीस मराठी, हिंदी लहानमोठे ग्रंथ आहेत. त्यातल्या अनेकांचे इतर भाषेत अनुवाद झाले आहेत. 'गीताई' हा त्यांचा ओवीबध्द छोटा ग्रंथ म्हणचे मराठी सारस्वताचं एक भूषणच आहे. ज्ञानेश्वरी आणि गीतारहस्य या दोन ग्रंथांच्या खालोखाल गीतानुवाद करणारं 'गीताई' हे चिमुकलं, पण अत्यंत मौलिक पुस्तक जो वाचील त्यालाच विनोबांच्या लेखनशक्तीचा प्रत्यय येईल. बी.ए. पर्यंत शिकलेले, संसाराकडे पाठ फिरवून गांधीजींचे शिष्यत्व पत्करलेले विनोबा पूर्वायुष्यात वाईक्षेत्री वर्ष दीड वर्ष होते. तिथे त्यांनी वेदोपनिषदांचा, रामायण महाभारताचा, गीतेचा, दासबोधाचा मनोभावे अभ्यास केला नि त्यांची समग्र जीवनदृष्टीच अध्यात्मवादी, सेवाभावी बनली. करुणा, चिंतनशीलता आणि रंजल्यागांजल्या जनतेची सेवा हे गुण पुढे गांधीजींच्या सहवासात येताच विनोबांच्या नसानसांत भिनले. गीतेचा त्यांनी स्वतःचा असा वेगळा अर्थ लावून 'गीताई' आबालवृध्दांना समजेल अशा सुबोध भाषेत रचली नि गीता ही युध्दाला, हिंसेला उत्तेजन देणारी नसून समत्वभाव, मानवतावाद आणि निर्भयपणे कर्तव्य शिकवणारी आहे असं प्रतिपादन केलं. तळहातावर मावणारी 'गीताई' या ओवीबध्द पुस्तकाच्या पन्नासावर आवृत्या निघणे आणि तिच्या लक्षावधी प्रती निघणे हा मराठी साहित्यातला चमत्कार आहे.

**गीताई माऊली माझी तिजा मी बाळ नेणता ।**
**पडता पडला घेई उचलूनि कडेवरी ॥**

अशा पंक्तींनी आरंभ करून 'गीताई ही ईश्वराने माझ्या हातून घडविलेली सर्वोत्तम सेवा मी समजतो' असे उद्‌गार ते काढतात. 'धर्मक्षेत्र कुरुक्षेत्रे'चा पुढील आरंभीचा अनुवाद -

**त्या पवित्र कुरुक्षेत्री पांडूचे आणि आमुचे ।**
**युध्दार्थ जमले तेव्हा वर्तले काय संजया ॥**

किती मूळाबरहुकुम नि अर्थपूर्ण साधला आहे पहा ! उदाहरणे सांगावीत तेवढी थोडी. पण शेवटच्या अध्यायाचा खालील शेवट

**योगेश्वर जिथे कृष्ण जिथे पार्थ धनुर्धर।**
**तिथे पाहतो नित्य धर्म श्री जयवैभव ॥**

मराठीतल्या भल्याभल्या कवींना असा करता आला नसता.

पण मला विनोबा हा माणूस नसून साधु, महामानव वाटतो तो आणखी वेगळ्या कारणांनी. त्यांचे नैष्ठिक ब्रम्हचर्य, देशस्वातंत्र्यासाठी समर्पित जीवन, गांधीतत्त्वनिष्ठा, साधी राहणी, आनंदाने आणि ज्ञानदानाने सोसलेला कारागृहवास आणि गांधीजींच्या माघारी देशभर पदयात्रा करुन गोरगरीब भूमीहीन जनतेसाठी त्यांनी केवळ कळकळीचा उपदेश करुन मिळवून दिलेली लाखो एकर जमीन हे केवढे महान कार्य! जगाच्या इतिहासात कायद्याचा वा शस्त्राचा उपयोग न करता, केवळ अहिंसामार्गाने आर्जवे करुन, पायी हिंडून 'सब भूमी गोपालकी'चा नामघोष करीत गरजवंतांना असं भूमीदान करणारा विनोबा हा एकमेव महामानव नव्हे का?



विनोबांना साम्ययोगी हे विशेष शोभून दिसतं. भूदान चळवळीची हा जनक केवळ राष्ट्रवादी नसून मानवतावादी होता. **'जय जगत'** हा त्याचा धर्म होता. स्वामी रामदासांच्या नंतर समाजाची चिंता वाहणारा आणि त्याच्या उपयोगी पडणारा विनोबांसारखा क्रियाशील, त्यागीविरागी माणूस क्वचितच कोणी असेल. ज्ञानाला कर्माची जोड हवी आणि विज्ञानाला अध्यात्माची साथ हवी असा उपदेश करणारा आचरणशील माणूस विसाव्या शतकातला संतच होता. पाऊणशे वर्षे मानवसेवा केल्यानंतर देह साथच देईनासा झाला तेंव्हा या साधुपुरुषाने ८८ व्या वर्षी प्रायोपवेशन करुन, ज्ञानदेवांप्रमाणे एकप्रकारे सुखासमाधानाने अवतार समाप्ती केली. पवनार आश्रमात मला या महापुरुषाचं दर्शन घेण्याची एकदाच संधी मिळाली. पण ते सुध्दा मी भाग्य समजतो. भारत सरकारने विनोबांना मरणोत्तर 'भारतरत्न' किताब दिला तो योग्यच होता. एकदा ते गमतीने म्हणाल्याचं आठवतं 'महाराष्ट्रात तीन उंच माड आहेत. माडगावकर (मुंबई वर्णनकर्ते), माडखोलकर आणि माडगूळकर.' अशा गमती, कोट्या नि विनोद हा भाषाप्रभु भावे अनेकदा करीत असे. असा क्रियाशील, विद्वान, मानवतावादी होणे नाही.

## महिमा साई सच्चरित ग्रंथाचा

*श्रोते परीसा महिमा, साई सच्चरिताचा ॥धृ०॥*

*एक एक अध्याय वाचिता*
*लागे ओढ मनां*
*साधी सोपी मधुर रचना*
*अर्थ बोध होता।*
*तनु रोमांचित होई*
*बोधामृत चाखिता ॥१॥*

*नवल कथांचे गेय वर्णुनि*
*साई बोध देती भक्तां*
*कृपा कटाक्षे साई पाहती*
*वरदहस्त देतां।*
*धन्य होईल*
*जीवन मनुजा*
*बोधामृत चाखिता ॥२॥*

*उदी महात्म्य सुलभ्य वर्णन*
*संजीवन मनुजा*
*उदी प्रसाद प्राशन करिता*
*टळती भवभय सारी।*
*धन्य होईल*
*जीवन मनुजा*
*बोधामृत चाखिता ॥३॥*

*श्रध्दा-सबुरी साई शिकवण*
*कृतार्थ करी*
*भक्तांचे जीवन।*
*परम कृपाळु मशीद माई*
*धुनी माईची*
*अखंड ठेवा।*
*धन्य होईल*
*जीवन मनुजा*
*बोधामृत चाखिता ॥४॥*

**❑ चंद्रकांत गरगटे**
सातारा.

# प्रबोधनकार संत गाडगे महाराज

- डॉ. रामचंद्र देखणे, पुणे.

— ❖ ❖ ❖ —

*संस्कृत भाषेत अडकलेला धर्म ज्ञानदेव-तुकोबांनी मराठीत आणून जनसामान्यांना खुला केला पण पुन्हा तो सांप्रदायिक परंपरा वाद्यांच्या प्रथांमध्ये बंदिस्त झाला. अशा बंदिस्त धर्माला संत गाडगेबाबांनी पुन्हा तळागाळातील जनतेसाठी मुक्त केले. भोळ्याभाबड्या अडाणी जनतेतील अंधश्रद्धा उच्चाटन करून त्यांना सरळसोप्या शब्दात निष्काम भक्तीयोग शिकविणारे गाडगेबाबा एक आगळे वेगळे संत होते. त्यांच्या कार्याची ओळख करून देणारा लेख -*

— ❖ ❖ ❖ —

**पवित्र ते कुळ पावन तो देश।**
**जेथे हरीचे दास जन्म घेती ॥**
**यातायाती धर्म नाही विष्णुदासा**
**निर्णय हा ऐसा वेदशास्त्री ॥**

संत तुकाराम महाराजांच्या ह्या वचनाप्रमाणे महाराष्ट्र ही भूमि पुण्यवान आहे, पावन आहे. ह्या महाराष्ट्रात दैदिप्यमान संतांची परंपरा अवतरली. सामान्य माणसाच्या जीवनात आनंद ओसंडून वहावा, त्याचे वैयक्तिक आणि सामुदायिक जीवन सुसह्य व्हावे, यासाठी आवश्यक असणारी जीवनमूल्ये समाजात रूजली जावीत, त्यातून विषमता, जातीयता, भेदाभेद, अविवेक, विकृती बाजूला जाऊन खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित व्हावी, समाजामध्ये परस्परात बंधुभाव नांदावा, उच्चनीचपणा सांडून जावा, अज्ञान नाहीसे होऊन सामाजिक विवेक जागा व्हावा या हेतुने मराठी संतांनी केलेले प्रबोधनकार्य महान आहे. समाजाच्या अंतरंगापर्यंत जाऊन त्यांच्या बोलीभाषेत त्यांना वेदांताची नीति शिकविणारी संतांची मांदियाळी हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी आध्यात्मिक विचारांना सामाजिक समतेची जोड दिली.

**जे जे भेटे भूत**
**ते ते मानिजे भगवंत**
**हा भक्तियोग निश्चीत**
**जाण माझा**

प्रत्येक भूतमात्र हा भगवंताचा आविष्कार आहे म्हणून सर्वाभूती भगवत्‌भाव आणि प्रेम ठेवणे हाच माझा भक्तियोग आहे अशी भक्तिची डोळस व्याख्या सांगून त्यांनी भक्तिचे सामाजिकरण केले. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांचा हा वारसा चालविणाऱ्या संत एकनाथांनी तर सामान्यांच्या बोलीभाषेत आणि समाजात रूढ असणाऱ्या वाघ्या मुरळी, भराडी, गोंधळी, वासुदेव, मलंग, पोतराज, फकीर, भुत्या, पिंगळा यासारख्या बहुरूढ लोकभूमिकांमधून आध्यात्मिक आणि सामाजिक मूल्यांची मांडणी करून खरे समाजशिक्षण घडविले आहे. 'मायबाप तुमचे नि आमचे एकच हाय' असा सिद्धांत सांगून सामाजिक समतेचा झेंडा अभिमानाने फडकविला आहे. तर तुकोबारायांनी -

**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म**
**भेदाभेद भ्रम अमंगळ ॥**

भेदाला अमंगळ ठरवून विष्णुमय जग पहाण्याची दृष्टि दिली आहे. 'अंचनीच कांही नेणे भगवंत' असा ठाम विचार देऊन विषमतेच्या वाटा मोडून समतेचीच पताका खांद्यावर मिरविली आहे. समाजातील विकृती, रूढी घालवून देऊन सत्‌विचारांची, समतेची, बंधुत्वाची मांडणी करणाऱ्या संतांनी आपल्या वाङ्‌मयातून, कृतीतून, कीर्तनातून याच विचारांचा पाठपुरावा करीत महाराष्ट्राचे सामुदायिक जीवन घडविले आहे. लोकोद्धाराच्या कार्यातून समाजाभिमुख असलेले झालेले संत हेच महाराष्ट्राचे खरे लोकशिक्षक आहेत.

## सन्मार्गाचा दीपस्तंभ

अशा महान संतांची परंपरा लाभलेल्या ह्या महाराष्ट्राला अलिकडच्या काळात संत गाडगेबाबांच्या रूपात संत-विभूती अवतरली आहे. मानवतेच्या विकासासाठी, पुरातन आणि जुनाट मार्ग सोडून नवीन वाटेने जाण्याची डोळस दृष्टि गाडगेबाबांनी दिली आहे. महाराष्ट्रातील सामाजिक अध:पतनाने व्यथित झालेल्या बाबांनी रूढींवर, ढोंगांवर, दंभावर, स्वार्था-वर, विषमतेवर, अज्ञाना-वर, कर्तव्यच्युतीवर, माणुसकीशून्य

वर्तनावर ठायी ठायी कडक टीका करून, स्वत:ला जे पटले ते आचरणातून आणून समाजाला तत्त्वज्ञानाचा खरा अर्थ सांगितला आहे. तत्त्वज्ञान, अध्यात्म ही केवळ विचारप्रणाली नसून ती शुद्ध आचारप्रणाली आहे. मानवी जीवनाच्या प्रगतीचे मार्गदर्शक आहे असे ठामपणे सांगून खरा 'जीवन वेदांत' समाजात रूजविला आहे. शुद्ध विचारांना शुद्ध आचाराची जोड देऊन आचार-विचारांचा समन्वयात्मक विवेक मांडणारा तो समाजमनाचा महान आदर्श आहे. बाबांचे व्यक्तिमत्व म्हणजे धगधगत्या अग्निकुंडाची कहाणी आहे. अज्ञान, दारिद्र्य, व्यसनाधीनता, विषमता याच्या अंध:कारात खितपत पडलेल्या समाजाला सन्मार्गाचा उजेड देणारा हा एक दीपस्तंभ आहे.

## कपडयाबरोबर मनही धुतली

परीट समाजात बाबा जन्मले. लोकांचे कपडे धुणे हाच परीटाचा पारंपारिक व्यवसाय. मळ घालविला की कपडे स्वच्छ होतात. आणि अशा स्वच्छ कपडयाने शरीर शोभून दिसते. बाबांनी कपडयाबरोबर आपल्या उपदेशाने लोकांची मनेही धुवून काढली. स्वच्छ कपडयाबरोबर स्वच्छ आणि निर्मळ मनाची माणसे उभी केली. समाजमनाची मलिनता धुवून काढली आहे. बाबांच्या काळी समाजात आणि विशेषत्वाने परीट समाजात लेकरू जन्मते त्यावेळी आणि कुणी मेले की बकरी कापले पाहीजे, जातगोतास दारू पाजली पाहीजे हा प्रघात जिकरीने पाळला जात होता. तो सामाजिक प्रतिष्ठेचा भाग मानला जात होता. खेडयापाडयात नांदणारा समाज शिक्षणापासून वंचित झाला होता. दारूच्या व्यसनात बुडाला होता, सावकाराच्या कर्जात डुबला होता; विकृत लोकरूढीत गुरफटला होता. दारिद्र्याने पिचला होता, अज्ञानाने गांजला होता. भेदाभेदाच्या कल्पनेने भंगला होता. दंभाचाराने बरबटला होता. आणि या साऱ्या विकृतींनाच उराशी कवटाळून मार्गक्रमण करीत होता. बाबांनी भ्रमंती करून ह्या समाजमनाचे उत्कृष्ट दर्शन घेतले. समाजाचे सूक्ष्म अवलोकन केले. त्यातूनच समाजाच्या उद्धाराचे चिंतन घडले.

## बाबांचे प्रबोधनकार्य

**ऐसी कळवळ्याची जाती।**
**करी लाभावीण प्रीति।**

संत ही कळवळ्याची जात आहे. ती लाभाविणा प्रीत करते असे तुकोबारायांनी म्हटले आहे. बाबाही ह्याच जातीचे आहेत. या परिभ्रमणात त्यांनी जनस्थितीची पाहणी केली, विद्येविना अडाणी समजुतीस बळी पडून समाजाचा अध:पात होतो आहे हे प्रत्यक्ष अनुभवले आणि मग सामाजिक कळवळ्यापोटी या सामाजिक अरिष्टांशी आपल्या अमोघ वाणीने जन्मभर झुंज दिली. प्रचंड धर्मशाळा बांधल्या, आंधळ्या पांगळ्यांसाठी सदावर्ते चालविली. निराधारांसाठी, गोरगरीबांसाठी अन्नछत्रे चालविली. गरीब मुलांच्या शिक्षणासाठी शाळा काढल्या, वसतीगृहे बांधली, शिक्षणाची सोय केली, कसायांकडून गाई सोडविल्या, अनाथ वृद्धांना प्रेमाने सांभाळले, कुष्ठरोग्यांना आश्रय दिला, गोरक्षणे काढली, दुष्काळग्रस्तांना अन्न पुरविले, गोरगरीबांची लग्ने लावून दिली. हजारो लोकांना व्यसनमुक्त केले, त्यांचे विझलेले संसार प्रफुल्लित झाले. देवाच्या नावे होणाऱ्या पशुहत्येवर जोरदार आघात केले. देव देव्हाऱ्यात-देवळात नसून दीन-दुबळ्यांमध्ये आहे, जनता जनार्दनात आहे.

**जाणे तरी सेवा**
**दीन दुबळ्यांची देवा।**

असे सांगून दीन-दुबळ्यांना प्रेमाने कवटाळले. त्यांच्या सेवेतच परमेश्वराची सेवा आहे असे मानले आणि कृतीनेही दाखविले. बोलीभाषेत श्रोत्यांशी संवाद करीत हा आचारधर्म आपल्या कीर्तनातून प्रभावीपणे मांडून फारच मोठे प्रबोधन घडविले.

## जे का रंजले-गांजले

साहित्यसम्राट आचार्य अत्रे म्हणतात -

'जे का रंजले गांजले त्यासी आपुले म्हणणारे बाबा आहेत. जगात दु:ख पाहून द्रवणारे ते 'नवनीत' आहेत. ज्यांना कोणी आपंगिता नाही, त्यांना हृदयाशी धरून त्यांच्या डोळ्यातील अश्रु पुसणारे आणि त्यांच्या जखमांवर फुंकर घालणारे ते साक्षात् 'भगवंताची मूर्ती' आहेत. महाराष्ट्राच्या सर्व भागात अहोरात्र संचार करून त्यांनी गरीबांची आणि दु:खितांची नानाप्रकारे सेवा केली आहे. डोक्यावर खापर आणि हातात खराटा घेऊन भ्रमंती करणारे ते खराटयाचे बादशहा आहेत. कोणत्याही गांवात त्यांनी पाऊल टाकले की, पहिल्याने त्यांच्या हातातला झाडू चालू लागे. मग लोक जागे होत आणि हातात खराटे घेऊन धावत. सकाळी गावातली घाण झाडूने साफ केली म्हणजे मग संध्याकाळी लोकांच्या डोक्यातली घाण ते कीर्तनाने साफ करीत. हे गाडगेबाबांच्या जीवनाचे आणि सेवेचे तंत्र आहे. हा महान समाजसेवक जनतेच्या कल्याणासाठी चंदनासारखा झिजला आहे.' महाराष्ट्राचे समाजवादी संत म्हणून आचार्य अत्रे यांनी गाडगेबाबांना गौरविले आहे.

## गाडगेबाबांचे कीर्तन

पुढे गाडगेबाबा म्हणून लोकाभिमुख झालेले त्यांचे व्यक्तिमत्व आपल्या कीर्तनद्वारा जीवनमूल्यांची मांडणी करीत 'प्रबोधन' घडवू लागले. बाबांचे कीर्तन हे प्रश्नोत्तररूपी असे. अगदी खेडुतांना समजेल अशा सोप्या भाषेत त्यांचे कीर्तन असे. व्यवहारातले, अगदी परसाअंगणातले दाखले ते कीर्तनातून देत असत. त्यांच्या कीर्तनासाठी साथ असली; असली-नसली, नसली केवळ दोन दगडही त्यांच्या टाळांचे काम करीत. त्यांचा वेष मोठा गंमतीदार असे. अंगावर चिंध्यांचा सदरा, डोक्यावर

गाडगे, हातात काठी अशा वेषात बाबा कुठल्याही गावी यायचे. कोणी भिकारी असेल म्हणून गावकरी हिडीसफिडीस करीत. कुठूनतरी एखादा खराटा मिळवून बाबा देऊळ व चावडीसमोरचे पटांगण झाडून काढीत. कुणी विचारले 'हे कशाला झाडतो ?'

बाबांनी म्हणावे -

'कुण्या बोआचं कीर्तन आहे म्हणे. झाडण्याले सांगतले.'

कीर्तन आहे हे कळताच भजनी मंडळीत हालचाल सुरू होई. टाळ मृदुंग मिळविले जात. कुणी एखादी भगभगती बत्ती आणून ठेवी. रात्री अचानक अंधारातून बाबा येऊन हाती एकतारी घेऊन उभे रहात.

लोक विचारीत.

'अरे गैबान्या, कीर्तनकार महाराज कुठे आहेत.'

बाबांनी उत्तर द्यावे.

'थे येत नाहीत. त्याहिनच मला धाडलं.'

बाबांचा वेष रूप पाहून लोक खदाखदा हसत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून बाबा कीर्तनाला उभे रहात. भजन सुरू करीत.

**गोपाला गोपाला**
**देवकीनंदन गोपाला....**

भगवान इतके तल्लीन व्हायचे की जमलेला श्रोतृवर्ग हळूहळू टाळ्या वाजवून त्या ब्रह्मानंदात एकरूप व्हायचा. बाबांचे भजन सुस्त असायचे. मध्येच खड्या आवाजात एखादे पद म्हणायचे -

**जिभले तुले काय धंदा।**
**घडीभर भज गे गोविंदा।**

हे स्वर कानी पडताक्षणी श्रोतेजन निष्ठेने ऐकू लागत; भजन रंगात आल्यावर मध्येत हात करून बाबा प्रश्न विचारीत 'नीट विचार करून सांगा - देव किती ?'

'- एऽऽक.'

'हां आता हिशेब करा. तुमच्या गावात देऊळ खंडोबाचं हाय का नाय !'

'आहे.'

'मग देव किती झाले ?'

फजील पावून लोक म्हणत -

'दोऽन.'

'तुमच्या बांधावर 'म्हसोबा' असतो का नाय ! मग देव किती झाले ?'

'तीऽन.'

'तुमच्या गावाच्या शिवेवर मरीमाय येऊन बसली का नाय ! मातामायची पूंजा करता का नाय.... मंग देव किती झाले ?'

'पांऽच.'

अशारितीने विरोबा, वेताळ, फेताळ, मैराळ, जारवाई, जोखाई, येसकाई - सगळ्या देवांची यादी बाबा ऐकवत आणि म्हणत - 'आं ! मग् मंगाशी देव एक म्हंताखेपी तुमची बुधी काय वान्याकडे गहान पडली होती काय ?'

जमाव खडबडून जागा होई आणि बाबा पुन्हा प्रश्न करीत -

'बरं या देवांना नवस करता की नाही ?'

'करतो.'

'असं म्हंता की नाही, देवा माझं पोरगं आजारी पडलं. याले बरं कर तुले एक बकरूं कापीन.'

'म्हणतो.'

'का बा ? देवाले काय दोन पायाचं कडू लागते काय ? ज्यानं पुर्थई पैदा केली थो देव इतला लालची, लाचखाऊ आहे काय ?'

**असा कसा तुमचा देव।**
**घेतो बकऱ्याचा जीव॥**

'पोरगं आजारी पडलं, म्हणून देवाला बकरू कापल. जे आजारी पडलं, त्याले डॉक्टरकडे न्यावावं का बकरू कापावं....' असा डोळस सल्ला देत बाबांच्या कीर्तनातून जीवन जगताना उपयुक्त ठरणारा जीवनवेदांताचा ओघवता प्रवाह वहात येई.

'कर्ज काढून देवाची यात्रा करू नका.'

'गाई बैलांची चिंता वहात जा.'

'मुलांना शिकवल्याविना राहू नका.'

'देवाला नवस करून कोंबडी-बकरी मारू नका.'

'भुकेल्याला अन्न द्या.'

'हुंडा घेऊन देऊन लग्ने करू नका.'

'शिवाशिव पाळू नका.'

'दारू पिवू नका.'

'देवाचे भजन केल्याशिवाय राहू नका.'

### प्रबोधनाचा कळस

आजही बाबांचा उपदेश समाजमनाला किती उपयुक्त आहे याची कल्पना येते. अडाणी-अशिक्षित समाजात जन्म होऊन भ्रमंती करीत सामान्यांच्या जीवनातील दुःख, दारिद्र्य, अज्ञान याचा अनुभव घेऊन तयार झालेले त्यांचे कीर्तन म्हणजे डोळस दृष्टिचे आणि शुद्ध आचारसंहितेचा आदर्शच म्हणावा लागेल. सामाजिक प्रबोधनाचा झेंडा खांद्यावर घेून विचारप्रणालीबरोबर आचारप्रणाली बाळगणारे गाडगेबाबा संत परंपरेतील सामाजिक प्रबोधनाचा कळस ठरावा इतके महान आहेत.



# साई वंदना

कवी : योगेश्वर अभ्यंकर

दीन अनाथांचा वाली
सकलांचा साई -
जनसेवा करण्यासाठी
उभी द्वारकामाई ॥धृ०॥

कुणी अनामिक उघड्यावरती
भिजत राहिला जलधारांनी
हातपायही झडले त्याचे
मूक वेदना दाटे नयनी
थरथरकांपे लटलट पायी ॥१॥

तोच अचानक खांद्यावरती
हात कुणाचा त्याच्या पडला
चलो भाई तुम जल्दी चलो रे
साईबाबा त्यांस बोलला
वाट पाही, द्वारकामाई ॥२॥

साईबाबा कसा येऊ मी
महारोगही मजला जडला
घर नाही मज भोग भोगतो
जन्मचि माझा वाया गेला
उरला नाही कोणी भाई ॥३॥

कोण बोलतो महारोग तुज
तूच खरोखर महान योगी
शरीर झडले सडो बिचारे
मन शुद्ध तुझे असे निरोगी
मीच तुझा रे होतो भाई ॥४॥

साई आणती घरास त्याला
शरीर पुसती रकटयाने रे
धुनी जवळही त्यास बसविले
भाकर देतो खाण्यासहि रे
असे रंगले भाई ॥५॥

❀ ❀ ❀

तेलही नसता पाण्याने रे -
ज्योति उजळल्या, ज्योति उजळल्या
अशी रे घडली साईलीला ॥धृ०॥

संध्याकाळी बाबा जाती
वाण्यापाशी तेल मागती
'जा रे बाबा' नकार देती -
फकीर वेडा, शिव्या मोजल्या ॥१॥

नकार मिळता बाबा हंसले
कुणास काही नाही वदले
विचारातही मग्न जहाले
गंमत दावू, झटका आला ॥२॥

पणत्यामधुनी पाणी घाली
आणि अचानक ज्योत उजळली
जगावेगळी घटना घडली
आश्चर्याचा धक्का बसला ॥३॥

फकीर वेडा जरी वाटतो
ज्ञानी मोठा, अनुभव वदतो
भक्त लाजतो वंदन करतो
नवा फुलोरा भाव भक्तीला ॥४॥

❀ ❀ ❀

महान योगी फकीर कोणी
साईबाबा शिरडीवाला
उद्धारास्तव भक्तजनांच्या
दत्तप्रभु रे अवतरलेला ॥धृ०॥

चांदभाईचे वऱ्हाड आले
शिरडीगांवी शादीसाठी
कुणी अवलिया सवे तयांच्या
कुतूहलाची वार्ता मोठी
शोध तयाचा सुरू जहाला ॥१॥

खंडोबाच्या देवळापाशी
तोच पाहिला फकीर कोणी
वाद चालला पुजाऱ्यासवे
त्यास हटकले बंदी करूनी
म्हाळसापती बघत राहिला ॥२॥

नजर मिळाली नजरेलाही
गहिवरता आर्त उमाळा
खूणा पटल्या जन्मोजन्मीच्या
म्हाळसापती पुढे थांबला
बेहोषीने वेडा झाला ॥३॥

दिव्यत्त्वाची प्रचीति येता
साक्ष पटे म्हाळसापतीला
आवो, आवो साई मेरे
मिठी मारली श्रीचरणाला
धन्य म्हाळसा प्रभु जिंकला ॥४॥

साईबाबा नांव तयांचे
पुण्यक्षेत्रही शिरडी बनले
मशीद झाली द्वारकामाई
भक्त बोलले अघटित घडले
सुरुवात अशी अवताराला ॥५॥

❀ ❀ ❀